दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे अंक -२५० मंगळवार,दि.१३ मे २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४

Beed Daily Marathi Year-5th Issue-250 Tuesday, Dt.13 May 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# दहशतवादी आणि त्यांचे आका एकच त्यांना सोडणार नाही - पंतप्रधान नरेंद्र मोदी

## पाकिस्तानशी बोलणी होईल, पण ती फक्त दहशतवाद आणि पाक व्याप्त काश्मीर यावरच !

## याद राखा,ऑपरेशन सिंदूर फक्त स्थगित केले आहे थांबवले नाही



नवी दिल्ली /राजयोग विशेष प्रतिनिधी

पाकिस्तानसोबत युद्धबंदी झाल्यानंतर ५१ तासांनी, पंतप्रधान मोदींनी सोमवारी रात्री ८ वाजता देशाला संबोधित केले. आपल्या २२ मिनिटांच्या भाषणात पंतप्रधानांनी पहलगाम हल्ला, ऑपरेशन सिंदूर, युद्धबंदी, दहशतवाद, सिंधू पाणी करार आणि पीओके यावर भाष्य केले.

पंतप्रधान म्हणाले की, ज्या दहशतवाद्यांनी आपल्या माता-भगिनींचे सिंदूर पुसले होते, त्यांचा आम्ही नाश केला आहे. आमच्या कारवाईत १०० हून अधिक भयानक दहशतवादी मारले गेले आहेत.पंतप्रधान म्हणाले की, पाकिस्तानच्या विनंतीवरून भारताने संघर्ष थांबवण्यास सहमती दर्शविली आहे. भारताने पाकिस्तानविरुद्धची लष्करी कारवाई फक्त पुढे ढकलली आहे. पाकिस्तानचा दृष्टिकोन पाहून आम्ही पुढील कारवाईचा निर्णय घेऊ.

हे माझ्यासाठी वैयक्तिक दुःख आहे

२२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी दाखवलेल्या क्रूरतेने देश आणि जगाला धक्का बसला होता. सुट्टी साजरी करणाऱ्या निष्पाप लोकांची कुटुंब आणि मुलांसमोर क्रूर हत्या हा दहशतीचा एक अतिशय भयानक चेहरा आहे. देशाची सुसंवाद तोडण्याचा हा एक घृणास्पद प्रयत्न होता. माझ्यासाठी वैयक्तिकरित्या, हे दुःख प्रचंड होते. या दहशतवादी हल्ल्यानंतर, संपूर्ण राष्ट्र, प्रत्येक नागरिक, प्रत्येक समाज, प्रत्येक वर्ग, प्रत्येक राजकीय पक्ष दहशतवादाविरुद्ध कठोर कारवाई करण्यासाठी एका सुरात उभा राहिला.

७ मे रोजी सकाळी संपूर्ण जगाने या प्रतिज्ञेचे परिणाम पाहिले

आम्ही भारतीय सैन्याला दहशतवाद्यांचा खात्मा करण्यासाठी पूर्ण स्वातंत्र्य दिले. आज, प्रत्येक दहशतवादी संघटनेला माहित आहे की आपल्या बहिणी आणि मुलींच्या कपाळावरील सिंदूर काढण्याचे काय परिणाम होतात. ऑपरेशन सिंदूर हे फक्त एक नाव नाही तर ते देशातील कोट्यवधी लोकांच्या भावनांचे प्रतिबिंब आहे. ऑपरेशन सिंदूर ही न्यायाची अखंड प्रतिज्ञा आहे. ६ मे रोजी रात्री उशिरा आणि ७ मे रोजी पहाटे, संपूर्ण जगाने हे आश्वासन परिणामात रूपांतरित होताना पाहिले.

भारतीय सैन्याने पाकिस्तानमधील दहशतवादी छावण्या आणि प्रशिक्षण केंद्रांवर अचूक हल्ले केले. भारत इतका मोठा निर्णय घेऊ शकेल, याची दहशतवाद्यांनी स्वप्नातही कल्पना केली नव्हती. पण जेव्हा देश एकजूट असतो, राष्ट्र प्रथम या भावनेने भरलेला असतो, राष्ट्र सर्वोच्च असते, तेव्हा कठोर निर्णय घेतले जातात. निकाल प्रदर्शित केले जातात. जेव्हा भारताच्या क्षेपणास्त्रांनी आणि ड्रोनने पाकिस्तानमधील दहशतवादी तळांवर हल्ला केला तेव्हा दहशतवादी संघटनांच्या इमारतीच हादरल्या नाहीत तर त्यांचे मनोबलही डळमळीत झाले.

पहिली: दहशतवादी हल्ला झाला तर त्याला योग्य उत्तर दिले जाईल. आम्ही आमच्या पद्धतीने आणि आमच्या स्वतःच्या अटींवर प्रतिसाद देऊ. जिथे जिथे दहशतवाद्यांची मुळे उफाळून येतील तिथे आम्ही कडक कारवाई करू.

दुसरी: भारत कोणताही आण्विक ब्लॅकमेल सहन करणार नाही. भारत त्यांच्या आश्रयाखाली वाढणाऱ्या दहशतवादी अड्ड्यांवर अचूक आणि निर्णायक हल्ला करेल.

तिसरी: दहशतवादाला आश्रय देणाऱ्या सरकारला आणि दहशतीच्या सूत्रधारांना आपण वेगळे घटक म्हणून पाहणार नाही. ऑपरेशन सिंदूर दरम्यान, जेव्हा पाकिस्तानी सैन्याचे उच्च अधिकारी मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांना निरोप देण्यासाठी जमले तेव्हा जगाने पाकिस्तानचे कुरूप सत्य पाहिले. हा राज्य पुरस्कृत दहशतवादाचा मोठा पुरावा आहे. भारत आणि त्याच्या नागरिकांना कोणत्याही धोक्यापासून वाचवण्यासाठी आम्ही निर्णायक पावले उचलत राहू.

आम्ही युद्धभूमीवर प्रत्येक वेळी पाकिस्तानला पराभूत केले आहे. ऑपरेशन सिंदूरने एक नवीन आयाम जोडला आहे. आम्ही नवीन युगातील युद्धात आमची श्रेष्ठता सिद्ध केली आहे. या कारवाईदरम्यान आमच्या मेड इन इंडिया शस्त्रांची सत्यता सिद्ध झाली. २१ व्या शतकातील युद्धात भारतात बनवलेल्या संरक्षण उपकरणांची वेळ आली आहे हे जग पाहत आहे.

जगभरातील दहशतवादी हल्ल्यांसाठी पाकिस्तानशी संबंध असलेले बहावलपूर आणि मुरीदके सारखे दहशतवादी अड्डे जागतिक दहशतवादाची विद्यापीठे आहेत,


# बोगस दानपत्र तयार करून जमिनीची विक्री

## नगर पालिकेचा तत्कालीन कार्यालयीन अधीक्षका डोंगरे याचेसह पाच जणांवर गुन्हा

प्रतिनिधी @ माजलगांव

बोगस दानपत्र तयार करून शासकीय जमिनीची विक्री केल्याप्रकरणी माजलगाव नगर पालिकेचा तत्कालीन कार्यालयीन अधीक्षक गणेश डोंगरे याचेसह पाच जणांविरोधात माजलगाव शहर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला.

मनुर रोडलगत असलेल्या नगर पालिका हद्दीतील सर्वे नंबर ६ मधील जमिनीस १६ सप्टेंबर २०२४ रोजी ४ हजार चौरस फुट जागेस लेआऊटला मान्यता देण्यात आली होती.या जमिनीतील ४०८ चौरस फुट जागा ही ओपन स्पेस म्हणून ठेवण्यात आली



होती.ही जमीन ही प्रकाश दयाराम जोशी यांच्या नावे होती.या ओपन स्पेस जागेवर अस्लमबेग मंजुरबेग मिर्झा याने येथील नगरपालिकेचे कार्यालयीन अधीक्षक गणेश पुंडलिक डोंगरे,नामांतर प्रमुख फुलचंद कटारे,पीटीआर प्रमुख सुधाकर रामभाऊ उजगरे,कर निरीक्षक वाजेदअली आबेदअली यांना हाताशी धरून शंभर रुपयांच्या बॉण्डवर मूळ मालकाचे दानपत्र व खोटे कागदपत्र तयार करून बनावट आदेश पीटीआर व गावठाण प्रमाणपत्र तयार करून शासकीय जागा हडपण्याच प्रयत्न केला. पालिकेचे सहायक नगररचनाकार आकाश राठोड यांच्या तक्रारीवरून वरीलप्रमाणे पाच कर्मचारी यांच्यावर

(उर्वरीत पान २ वर)

# गाळ माफियांनी केला धुनकवाड येथील माजी उपसरपंचावर हल्ला

## दहा दिवस लोटले तरी आरोपी मात्र मोकाटच

प्रतिनिधी @ वडवणी

धारुर तालुक्यातील धुनकवाड येथे माजी उपसरपंचावर गाळ माफिया व गावगुंडांनी जिवे मारण्याच्या उद्देशाने हल्ला करून हात व करंगळी फ्रॅक्चर करून गंभीर दुखापत केली आहे.असुन या आधी ही या गावगुंडावर ३०२ व इतर मारहाणी सारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत.त्यांच्या विरोधात धारुर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असुन हा गुन्हा दाखल होऊन दहा दिवसांचा कालावधी लोटला तरी सुद्धा आरोपी मोकाटच असुन पोलिसांचे या आरोपींकडे कानाडोळा आहे तरी हे आरोपी गावातच खुले आम फिरताना दिसत आहेत.दि.३०/४/२०२५रोजी दत्ता भिमराव यादव यांनी जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक यांना धुनकवाड येथील कुंडलीका धरणातील अवैध गाळ उपसा बंद करा म्हणून निवेदन दिले होता हा ही मनात राग धरून गाळ माफिया व गावगुंडांनी माजी उपसरपंच वर हल्ला केला.

दि.०२/०५/२०२५ रोजी माजी उपसरपंच दत्ता भिमराव यादव हे धारुर येथे आठवडी बाजार करिता मोटार सायकल वरुन जात असतांना दुपारी ३ वाजणेच्या सुमारास धुनकवाड फाटा येथे आलो असता तेथे त्यांच्याच भावकीतील दत्ता छत्रभुज यादव तिथे उभा होता त्याने मला जुने भांडणावरुन शिवीगाळ केली. परंतु मी त्यास न बोलता धारुर येथे आलो. आठवडी बाजार करुन धारुर येथुन गावी धुनकवाड येथे जात असतांना धुनकवड फाट्याजवळ रात्री ८ वाजण्याच्या सुमारास गावातील गावगुंड दत्ता छत्रभुज यादव हा तीथे उभा होता. त्याने माझे गाडीला हात करून थांबवले. त्यास काय झाले असे विचारले असता त्याने मला तु आता पटांगणामध्ये आला आहेस तु मागिल भांडणात चुकुन राहीला होतास तुला आता सुट्टीच नाही असे म्हणुन त्याचे जवळ ठेवलेला लोखंडी गज हातात घेऊन डाव्या हातावर मारुन मनगट व करगंळी फॅक्चर करुन गंभीर जखमी केले. त्यानंतर आमच्या गावातील गोरख गोविंदराव यादव, पाराराम गोंविदराव यादव, छत्रगुण गोविंदराव

(उर्वरीत पान २ वर)

# मुख्यमंत्री युवा रोजगार योजनेतील प्रशिक्षणार्थ्यांची कुचेष्टा

## सरकारने काम करून घेतले मात्र मानधन न दिल्याने नाराजीचा सूर

प्रतिनिधी @ बीड

मुख्यमंत्री युवा रोजगार योजने अंतर्गत सहा महिन्यांचे प्रशिक्षण पूर्ण करूनही प्रशिक्षणार्थ्यांना अद्याप मानधन मिळालेले नाही. शासनाकडून पुढील नियुक्त्यांची ऑर्डर दिली गेलेली नाही आणि मागील दोन महिन्यांचे मानधन थकलेले आहे. परिणामी, प्रशिक्षणार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

या योजनेतून निवड झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांनी सहा महिन्यांचे प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले. मात्र, त्यानंतर तीन महिने उलटूनही दोन महिन्यांचे मानधन मिळालेले नसल्याने बेरोजगारांनी आपला उदरनिर्वाह कसा करावा असा प्रश्न पडला आहें. शासनाकडून पुढील आदेश न मिळाल्याने आणि मागचे मानधन प्रलंबित असल्याने, इकडे आड तिकडे विहीर अशी अवस्था निर्माण झाली आहे.या परिस्थितीमुळे प्रशिक्षणार्थ्यांमध्ये संतापाची भावना असून, महिन्या अखेरीस मानधन मिळाले नाही तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.आझाद मैदान मुबंईवर बेरोजगार युवा युवतीन्नी आपल्या

(उर्वरीत पान २ वर)

# पिंगळी येथे विहिरी उडी घेऊन युवकाची आत्महत्या

## कर्जाला कंटाळून उचलले पाऊल

प्रतिनिधी @ ताडकळस

पिंगळी येथे कर्जाला कंटाळून विहीर उडी घेऊन एका २८ वर्षीय शेतक-याने आत्महत्या केल्याची घटना रविवार (दि. ११)रोजी उघडकीस आली. याबाबत अधिक



माहिती अशी की, परभणी तालुक्यातील पिंगळी येथील मयत शेतकरी ज्ञानेश्वर माणिकराव साबळे (वय २८) रा. पिंगळी ता. परभणी यांनी शनिवार रात्री ७ ते रविवार सकाळी ५ वाजण्याच्या दरम्यान पिंगळी शिवारात शेत गट क्रमांक ६१० परिसरात शेतकरी वसंत भागोजी लांडगे यांच्या विहीरीत उडी मारुन आत्महत्या केली. मयत शेतरकी ज्ञानेश्वर साबळे यांनी सततच्या नापिकीमुळे व

(उर्वरीत पान २ वर)

# वादळी-वारा, पावसाने झालेल्या नुकसानीची आ.संदीप क्षीरसागरांकडून पाहणी

## तातडीने पंचनामे करण्याचे प्रशासनाला निर्देश



प्रतिनिधी @ बीड

वादळी-वारा व अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीची आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. तसेच झालेल्या

(उर्वरीत पान २ वर)

# खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीचा जामीन फेटाळला!

## ॲड. अक्षय मुळे यांनी मांडली पीडितेची बाजू

प्रतिनिधी @ बीड

बीड येथील सत्र न्यायालयाने एका गंभीर गुन्ह्यातील आरोपी राजू मुस्ताक पठाण याचा जामीन अर्ज फेटाळला आहे. आरोपीवर भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम १०९, ३३३, ११५(२) अंतर्गत गुन्हा क्रमांक ३८१/२०२४ दाखल आहे. पेठ पोलीस स्टेशन, बीड येथे या खटल्याची सुनावणी सुरू आहे. फिर्यादीनुसार, १० डिसेंबर २०२४ रोजी रात्री ९ वाजता पीडिता घरी एकटी असताना आरोपी तिच्या घरात अनधिकृतपणे घुसला. त्यावेळी त्याने शर्ट घातलेला नव्हता. त्याने पीडितेचा उजवा



हात मुरगळला आणि तिच्या चेहऱ्यावर मारले. तिला खाली पाडून तिच्या छातीवर बसून त्याने तिचा गळा दाबण्याचा प्रयत्न केला. पीडितेने आरडाओरड केल्याने तिची बहीण नितीन सखाराम चिंचकर यांनी धाव घेऊन तिला वाचवले. आरोपीने त्यांच्यावरही हल्ला करण्याचा प्रयत्न केला.

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777



संपादकीय

## शस्त्रसंधीनंतरची संधी

शस्त्रसंधीसाठी अमेरिकेकडे धाव घेणे, स्वत:हून भारताशी संपर्क साधणे ही कृती पाकिस्तानची निकड दाखविणारी होती. आपली गरज भागल्यावर पाकिस्तान पुन्हा नखे बाहेर काढतो, हा आजवरचा अनुभव आहे.

आण्विक शक्ती असलेल्या भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्ध फार काळ टिकणार नाही, आंतरराष्ट्रीय समुदाय तो टिकू देणारही नाही, ही वस्तुस्थिती होती. त्यामुळे दोन्ही देशांत शस्त्रसंधी होणे आश्चर्यकारक म्हणता येणार नाही. खरे तर त्याचे स्वागतच करायला हवे. मात्र, युद्धाचा जोरात भडका उडण्याची शक्यता असताना आणि पाकिस्तानला दीर्घकाळ लक्षात राहील, असा धडा शिकविण्याची व्यापक देशभावना असताना शस्त्रसंधी जाहीर होणे आश्चर्यकारक होते, हे मान्य करावे लागेल.

'ऑपरेशन सिंदूर'द्वारे पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू-काश्मीरमधील दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त करून आणि काही दहशतवाद्यांचा खात्मा करून भारताने पहलगाम हल्ल्याचा हिशेब चुकता केला आणि आपल्या देशाच्या विरोधातील दहशतवादी कारवायांना चोख प्रत्युत्तर देत राहणार असल्याचा संदेश जगाला पुन्हा एकदा दिला हे खरे. पाकिस्तानवरील हल्ल्यांचे उद्दिष्ट भारताने या अर्थाने पूर्ण केले; परंतु पाकिस्तानने प्रतिहल्ले केल्यानंतर आणि तेही लष्करी तळांना लक्ष्य केल्यानंतर त्याचा शक्तिपात करून वाटाघाटीसाठी विवश करणे आणि त्याने पुन्हा अशी आगळीक न करणे हेही उद्दिष्ट होते. ते कितपत पूर्ण झाले हा प्रश्न आता उपस्थित होऊ शकतो. मात्र, स्कार्डूपासून लाहोरपर्यंत आणि पाकिस्तानी लष्कराचे मुख्यालय असलेल्या रावळपिंडीपर्यंत हल्ले करून त्याच्या क्षमतेला भारताकडून ठेच पोहोचल्याचे दिसते आहे.

शस्त्रसंधीसाठी अमेरिकेकडे धाव घेणे, स्वत:हून भारताशी संपर्क साधणे ही कृती पाकिस्तानची निकड दाखविणारी होती. आपली गरज भागल्यावर पाकिस्तान पुन्हा नखे बाहेर काढतो, हा आजवरचा अनुभव आहे. शस्त्रसंधीनंतर काही तासांतच त्याचे उल्लंघन करून याही वेळी पाकिस्तानने आपली अविश्वासार्हता सिद्धच केली. 'ऑपरेशन सिंदूर' कायम ठेवण्याचे आणि पाकिस्तानबरोबरील वाटाघाटी दहशतवाद्यांपुरताच मर्यादित राहणार असल्याचे जाहीर करून भारताने सावधानता दाखविली आहे. ती कायम राहायला हवी.

पहलगाम दहशतवादी हल्ल्याने भारताला बेसावध असताना पकडले हे खरे; परंतु त्यानंतर मोदी सरकारने उचललेले प्रत्येक पाऊल पाकिस्तानला कोंडीत पकडणारे होते. साठ दशकांहून अधिक काळ सुरू असलेल्या सिंधू जलवाटप करार स्थगित करण्याचा भारताचा निर्णय पाकिस्तानसाठी धक्कादायक होता. सिंधूच्या पाण्यामुळेच पाकिस्तानात, विशेषत: तेथील पंजाबमध्ये सुबत्ता आहे. म्हणून पाणी रोखण्याची भारताची कृती म्हणजे युद्धच असल्याचे पाकिस्तानने जाहीर केले. याआधीच्या दहशतवादी कारवायांना भारताने चोख प्रत्युत्तर दिले होते. त्यामुळे पहलगामनंतर भारत अशी कारवाई करणार हे स्पष्टच होते.

आंतरराष्ट्रीय सीमेच्या शंभर किलोमीटर आतील दहशतवादी तळांना लक्ष्य करून भारताने आपले उद्दिष्ट साधले. हा घाव वर्मी बसल्यानंतर पाकिस्तानने भारतातील लष्करी तळांना आणि निरपराध नागरिकांना लक्ष्य केले. जोडीला अपप्रचाराची आघाडीही उघडली. भारताने धार्मिक स्थळांवर हल्ला केल्याचा कांगावा केला; तसेच खोटे दावेही केले. पाकिस्तानने छेडलेल्या या दोन्ही आघाड्यांवरील हल्ल्यांना भारताने परतवून लावले. शिवाय त्याची हवाई संरक्षण व्यवस्थाही भेदली. त्याचबरोबर जगभर भारताने आपली बाजूही भक्कमपणे मांडली आणि पाकिस्तानचा दहशतवादी चेहरा जगासमोर उघडा केला. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीत पाकिस्तानला हव्या असलेल्या कर्जाचा पुढचा हप्ता रोखण्याचाही प्रयत्न भारताने केला. त्यात यश आले नसले, तरी ही व्यूहनीती परिणामकारक होती.

# राज्य सरकारची संरक्षण दलांसोबत बैठक अधिक समन्वयाने काम करणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

प्रतिनिधी @ मुंबई



भारत आणि पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर संरक्षण दल आणि राज्य सरकार यांच्यात एक महत्त्वपूर्ण बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेत वर्षा निवासस्थानी झाली. या बैठकीत राज्य सरकार संरक्षण दलांसोबत अधिक समन्वयाने काम करेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत राज्यातील सुरक्षेवर आणि सज्जतेवर झालेल्या या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते. राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, भारतीय लष्करातर्फे लेफ्ट. जनरल पवन चढ्ढा, कर्नल संदीप सील, भारतीय नौदलातर्फे रियर ॲडमिरल अनिल जग्गी, नौदल कमांडर नितेश गर्ग, भारतीय वायुदलातर्फे एअर वाईस मार्शल रजत मोहन बैठकीला उपस्थित होते. रिझर्व्ह बँक, जेएनपीटी, बीपीटी, मुंबई स्टॉक एक्सचेंज, नॅशनल स्टॉक एक्सचेंज, एटीएस, होमगार्ड यांचे प्रतिनिधीही उपस्थित होते.

गुप्तचर माहितीचे आदानप्रदान, तंत्रज्ञानाचा अधिक वापर आणि काय खबरदारी घ्यायची याबरोबरच संरक्षण दलांना राज्य सरकारतर्फे अपेक्षित सहकार्य आणि अधिक गतीची समन्वय यंत्रणा उभारण्यावर या बैठकीत चर्चा झाली. यावेळी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भारतीय सैन्याने ज्या ताकदीने आणि अचूकपणे ऑपरेशन सिंदुर राबविले, ते अभूतपूर्व आहे. संरक्षण दलाला मी सॅल्युट करतो. मुंबईसारखे शहर हे अतिशय महत्वपूर्ण आहे. मुंबई भारताची आर्थिक राजधानी आहे. यापूर्वी मुंबईवर हल्ले झाले तेव्हा शत्रूकडून आम्ही भारताच्या आर्थिक राजधानीवर हल्ला केला हे दाखवण्याचा प्रयत्न झाला. येणाऱ्या काळात संपूर्ण ताकदीने काम करावे लागेल. या स्थितीत गुप्तचर माहितीचे आदान-प्रदान हे अत्यंत महत्वपूर्ण आहे. सायबर सुरक्षेबाबत सर्वांनाच अधिक काळजी घ्यावी लागेल. राज्य सरकारचे वरिष्ठ अधिकारी आणि संरक्षण दलाचे अधिकारी मिळून अधिक समन्वयाने एकत्रितपणे काम करुया.

मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, अपर मुख्य सचिव अश्विनी भीडे, सचिव श्रीकर परदेशी, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव इक्बालसिंग चहल, पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती, मुंबई महापालिका अतिरिक्त आयुक्त विपीन शर्मा, नागरी सुरक्षाचे अतिरिक्त पोलिस महासंचालक प्रभातकुमार, गुप्तवार्ता विभागाचे अतिरिक्त पोलिस महानिरीक्षक शिरीष जैन, राज्यातील आपत्ती व्यवस्थापनच्या अतिरिक्त मुख्य सचिव सोनिया सेठी, तसेच मुंबई जिल्हा आणि मुंबई उपनगर जिल्हाधिकारी आणि इतर विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

# शहागड गोदापात्रात तहसीलदारांचा हवेत गोळीबार

## आज तुला बघतो म्हणतं तहसीलदाराच्या अंगावर ट्रॅक्टर घालण्याचा प्रयत्न

प्रतिनिधी @ शहागड

शहागड येथील गोदावरी नदीपात्रातून होणारा बेसुमार वाळू उपसा रोखण्यासाठी गेलेल्या तहसीलदारावर वाळू तस्कर आज तुला बघतो असे म्हणतं वाळू तस्कराने तहसीलदार विजय चव्हाण यांच्या अंगावर ट्रॅक्टर घालण्याचा प्रयत्न केला जीवाच्या भिती पोटी तहसीलदार विजय चव्हाण यांनी जीव वाचवण्यासाठी रिव्हॉल्व्हर मधून चार राऊंड फायर केले तहसीलदार यांनी महसूल पथकासह शहागड येथील गोदावरी नदीपात्रातून होणाऱ्या अवैध वाळू चोरीवर कारवाई करण्यासाठी गेले असता त्यांच्या अंगावर वाळूमाफियांनी ट्रॅक्टर घालून त्यांना जिवे मारण्याचा प्रयत्न केला. यावेळी स्वसंरक्षणार्थ तहसीलदारांनी त्यांच्या खासगी। पिस्तूलमधून हवेत चार राऊंड फायर केले.तहसीलदार महसूल पथकासह गोदावरी नदीपात्रातून होणारी अवैध वाळू उत्खनन रोखण्यासाठी दि.११ रोजी सकाळी सहा वाजल्यापासून गस्त करत गोपनीय माहिती मिळाली असता मौजे शहागड येथे अवैध वाळू उपसा करून ट्रॅक्टर मध्ये अवैध रित्या वाहतूक करत आहे.



अंबड तालुक्यातील शहागड येथे तहसीलदारांनी गोदावरी नदीपात्रात छापा टाकल्यानंतर जप्त केलेले वाळूचे ट्रॅक्टर.

चव्हाण हे रविवारी सकाळी सहा वाजता गोदापात्रात गेले असता त्यांना तीन ट्रॅक्टरमधून काही जण वाळू चोरी करीत असल्याचे निदर्शनास आले. यावेळी तहसीलदारांसोबत असलेला चालक संतोष दत्ता घोडके यांनी ट्रॅक्टर पकडण्याचा प्रयत्न केला असता त्याला ढकलून देत वाळूमाफियांनी ट्रॅक्टर नेण्याचा प्रयत्न केला. यादरम्यान चव्हाण यांनी ट्रॅक्टर अडविण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्या अंगावर ट्रॅक्टर घालण्याचा प्रयत्न केला. यावेळी ते बाजूला झाल्याने वाचले. त्यानंतर माफियांनी हातात काठ्या घेत चव्हाण यांना घेरले. यावेळी आत्मरक्षणासाठी त्यांनी स्वतःच्या पिस्तूलमधून फायर केल्यानंतर वाळूमाफिया पसार झाले. तहसीलदारांनी केलेल्या कारवाईत दोन ट्रॅक्टर व वाळू असा ११ लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. शहागड येथील गोदापात्रातून गेवराई तालुक्यातील वाळूमाफिया मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा करीत आहेत. या पूर्वीही या ठिकाणी महसूल कर्मचार्यांवर हल्ले झाल्याच्या घटना घडल्या आहेत.

२रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अंबड जि. जालना
यांच्या न्यायालय
किरकोळ दिवाणी अर्ज क ९६/२०२५
विश्वनाथ व ईतर वि निरंक
नि.कं -
पुढील तारीख १६ / ०६ / २०२५

अर्जदार
१. विश्वनाथ काशिनाथ दिसागज
२. अशोक काशिनाथ दिसागज
सर्व रा. देशमुख नगर, अंबड जि. जालना

कलम :-बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम २ व ७ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज.

अर्जदार यांनी विधीज्ञ यांच्यामार्फत या न्यायालयात असा अर्ज केला आहे की, अर्जदार यांचे आई मयत नामे शकुंतला काशिनाथ दिसागज हे दि. ०९/०२/२००७ रोजी मयत झाले असुन अर्जदार हे मयत यांचे एकमेव वारस आहे. अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामासाठी कार्यवाहीसाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

करीता या जाहीर प्रगटन द्वारे सर्वत्र कळविण्यात येते की या बाबत जर कोणास काही एक आक्षेप असेल तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत या न्यायालयात आपला आक्षेप सादर करावा. जर नमुद केलेल्या काळात कोणाचाही आक्षेप आला नाही, तर संबंधीत प्रकरणात कायदया प्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि. ०८/०५/२०२५ रोजी यांची माझ्या सहीनीशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले आहे.

स्वाक्षरित/-
(मोहम्मद अस्लम)
दिवाणी विभाग प्रमुख
२रे सहदिवाणी न्यायालय
(क. स्तर),
अंबड जि.जालना

शिक्का

आदेशान्वये,
स्वाक्षरित/-
अधिक्षक
दिवाणी न्यायालय
(व.स्तर), अंबड
जि.जालना

# बेनसुर येथील शेतकऱ्यांची रेन्यु पावर कंपनीकडून फसवणूक

## आंब्याची झाडे तोडली पिकांची नासाडी

जिल्हाधिका-यांना लेखी तक्रार करूनही १ रुपयाही नुकसान भरपाई मिळाली नाही - डॉ.गणेश ढवळे

प्रतिनिधी @ पाटोदा

पाटोदा तालुक्यातील शेतकऱ्यांची पवनचक्की कंपन्यांकडुन करण्यात आलेल्या फसवणुकीचे दररोज नवनवीन प्रकार उघडकीस येत आहेत. पाटोदा तालुक्यातील बेनसुर येथील शेतकरी राजाभाऊ दशरथ सगरे यांच्या मालकीच्या ताब्यातील गट नंबर ५६८ मधील १ हेक्टर ३२ आर मधुन रेन्यु पावर कंपनीची टावर लाईन टाकलेली आहे.त्याच गट नंबर मध्ये मोठा लाईटचा टावर उभा करण्यात आला आहे. वर्षभरापूर्वी टावर उभा करण्यासाठी लागणारी क्रेन , जेसीबी, मशिन, ट्रॅक्टर,हायवा,ट्रक आदि यंत्रसामुग्री नेताना आंब्याची १० वर्षांपूर्वीची ३ झाडे व विद्युत तारा ओढताना ५ झाडे तोडण्यात आली आहेत.



तसेच तेव्हा कांदा पिकाचे नुकसान केलेले आहे. राजाभाऊ सगरे यांना झाडांची व कांदा आणि मिरची पिकाची झालेली नुकसान भरपाई देण्याचे कबुल केले होते. विशेष म्हणजे कोणत्याही कागदपत्रांवर सगरे यांची स्वाक्षरी सहमती नाही. त्यांनी कंपनीकडे वारंवार नुकसान भरपाईची मागणी करूनही नुकसान भरपाई न मिळाल्याने दि.१३.०३.२०२५ रोजी जिल्हाधिकारी बीड यांना लेखी तक्रार दिली.परंतु यावर अद्याप जिल्हा प्रशासनाने दखल घेतली नाही. आज दि.१२ सोमवार रोजी रेन्यु पावर कंपनीचे खंडाळा येथील कार्यालयात गेलो असता त्यांनी पुर्वीचे अधिकारी बदलुन गेले आहेत. त्यामुळे तुम्ही आणि ते बघुन घ्या असे म्हणत पेपरला बातम्या देऊ नका नाहीतर वाईट परिणाम होतील अशी धमकी सुद्धा दिली असे डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्याशी संवाद साधताना सांगितले. एकंदरीतच जिल्हा आणि पोलिस प्रशासन जर पवनचक्की कंपन्यांच्या दावणीला बांधले गेले असेल तर दाद कोणाकडे मागायची असा उद्विग्न सवाल राजाभाऊ सगरे यांनी केला आहे.

## पान १ वरून...

### गाळ माफियांनी...

यादव, रामेश्वर छत्रगुण छत्रगुण यादव, गोवर्धन गोरख यादव,वचिष्ठ गोरख यादव, रामा विठ्ठल मस्के यांना फोन करुन बोलावुन घेतले. त्या सर्वांनी मिळुन लाथाबुक्याने मारहाण केली व गोरख गोविंदराव यादव यांनी त्यांना काठीने डाव्या हातावर मारुन मुक्कामार दिला.यानंतर त्यांचे चुलत भाऊ दत्ता सुर्यकांत यादव व नवनाथ शिवहार यादव यांना फोनकरुन बोलावुन घेतले. त्यांनी आमचे भांडणाची सोडवा सोडव केली. त्यानंतर माझे चुलत भाऊ यांनी मला धारुर पोलिस ठाण्यात तक्रार देण्यासाठी घेऊन आले. परंतु हाताला मार लागला असल्याने त्यांना उपचारासाठी धारुर येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवले व तेथील डॉक्टरांनी त्यांच्यावर प्रथमोपचार करुन पुढील इलाजाकरिता स्वामी रामानंद तीर्थ शासकीय रुग्णालय अंबाजोगाई येथे पाठवले. तेथे उपचार घेऊन आल्यानंतर धारुर पोलिस ठाण्यात येऊन दत्ता भिमराव यादव यांना मारहाण करणारे धुनकवाड येथील गाळ माफिया व गावगुंड दत्ता छत्रभुज यादव, गोरख गोविंदराव यादव, पाराराम गोंविदराव यादव, छत्रगुण गोविंदराव यादव, रामेश्वर छत्रगुण यादव, गोवर्धन गोरख यादव,वचिष्ठ गोरख यादव, रामा विठ्ठल मस्के यांच्या विरुद्ध तक्रार दाखल करुन भारतीय न्याय संहिता (बी एन एस), २०२३ नुसार कलम ११८(२),११८(१),११५(२),१९१(२),१९१(३),१९०,३५१(२),३५१(३) आदि कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी अद्यापही मोकाटच असुन गावात खुलेआम फिरत आहेत तरी याकडे पोलिसांचा मात्र कानडोळा असल्याचे दिसत आहे.

जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांना दिले होते निवेदन.

धुनकवाड येथील माजी उपसरपंच दत्ता भीमराव यादव यांनी दि. ३०/४/२०२५ रोजी जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांना निवेदन देऊन धुनकवाड येथील कुंडलिका धरणातील अवैध गाळ उपसा बंद करा म्हणून निवेदन दिले होते हा मनात राग धरुन माजी उपसरपंच दत्ता भिमराव यादव यांना मारहाण केली असुन गाळ माफियांची मुजोरी वाढली असून जर हा गाळ उपसा बंद केला असता तर या माजी उपसरपंच हल्ला झाला नसता.

गाळमाफियांची मुजोरी वाढली...

गेल्या अनेक दिवसांपासून धुनकवाड येथील कुंडलीका धरणातील अवैध गाळ उपसा चालू असुन हे गाळ माफियांचा अनेकांना त्रास होत असुन हे गाळ माफिया अनेकांना धमकी देत आहेत यामुळे गाळ माफियांचा मुजोरी वाढली आहे.तरी प्रशासनाला पण ह्या गाळ माफियांना कधी पर्यंत पोसायचे आहे हे मात्र सांगता येईना.

### वादळी-वारा, पावसाने ...

नुकसानीचे तात्काळ पंचनामे करण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाला दिले आहेत.

## पान १ वरून...

सोमवारी (दि.१२) रोजी बीड मतदारसंघातील बीड शहर आणि ग्रामीण भागात अचानक वादळी वार्यासह मुसळधार पाऊस झाला. या पावसामुळे नागरिकांचे आणि शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या अनुषंगाने बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी विविध नुकसानग्रस्त ठिकाणी तात्काळ जाऊन पाहणी केली. झालेल्या अवकाळी पाऊस आणि वादळी वार्यामुळे शेतीचे तसेच नागरिकांच्या घरांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानींचे तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्तांना शासनस्तरावरून मदत करण्यासाठी कार्यवाही करण्यासाठी प्रशासनाला आ.क्षीरसागर यांनी निर्देश दिले आहेत.

विद्युत व्यवस्था सुरळीत करण्याच्या सूचना

अचानकपणे जोरदार वादळी वारे सुटल्याने विद्युत वितरणाची व्यवस्था विस्कळीत झाली. अनेक ठिकाणी विद्युत तारा तुटल्या तसेच विद्युत खांब पडले आहेत. त्यामुळे वीज पुरवठा खंडित झाला आहे. बीड शहर आणि ग्रामीण भागात तात्काळ वीजपुरवठा सुरळीत करण्याच्या सूचनाही आ.संदीप क्षीरसागर यांनी विद्युत विभागाला दिल्या आहेत.

### पिंगळी येथे विहिरी...

ग्रामीण बँकेचे घेतलेले कर्ज कसे फेडावे? या विवंचनेतून विहरीत उडी मारून आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच ताडकळसचे ठाणेदार गजानन मोरे यांच्या मार्गदर्शनात पोलीस जमादार संतोष चाटे, आप्पाराव व-हाडे यांनी घटनास्थळी जाऊन घटनेचा पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शासकीय दवाखान्यात पाठविला.

या विषयीची फिर्याद किशोर गणपतराव साबळे रा. पिंगळी यांनी ताडकळस पोलीसांना दिली. यावरून ताडकळस पोलिसांत आकस्मिक मृत्युची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास ताडकळसचे ठाणेदार गजानन मोरे यांच्या मार्गदर्शनात जमादार संतोष चाटे हे करीत आहेत.

### खुनाचा प्रयत्न....

त्यानंतर आलेल्या अक्षय शशिकांत शहाणे आणि जय पावले यांनी आरोपीला पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. दुसऱ्या दिवशी या घटनेची तक्रार दाखल करण्यात आली.

तपासात पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला आणि पीडितेचे कपडे जप्त केले. वैद्यकीय तपासणीत पीडितेच्या तोंडाच्या डाव्या व खालच्या बाजूला ओरखडे आढळले. साक्षीदारांचे जबाब नोंदवण्यात आले असून, आरोपीला अटक करून आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे.आरोपीच्या वकिलांनी युक्तिवाद केला की, आरोपी आणि पीडितेमध्ये

## पान १ वरून...

कोणतेही पूर्वीचे वैर नव्हते आणि आरोपीने आपला जीव वाचवण्यासाठी घरात प्रवेश केला होता. पीडितेला झालेल्या जखमा साध्या स्वरूपाच्या आहेत, त्यामुळे जामीन मंजूर करावा.

याउलट, पीडितेची बाजू मांडताना ड. ए. व्ही. मुळे यांनी आरोपीच्या जामिनाला जोरदार विरोध केला. त्यांनी सांगितले की, आरोपीने पीडितेच्या जीवे मारण्याचा प्रयत्न केला होता आणि तो शर्ट न घालता घरात घुसला होता. त्यांनी न्यायालयाचे लक्ष आरोपीच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीकडे वेधले आणि जामीन नाकारण्याची विनंती केली. सरकारी वकील ड. ए. डी. राख यांनीही त्यांच्या भूमिकेचे समर्थन केले.सुनावणीदरम्यान, सरकारी वकिलांनी न्यायालयाला सांगितले की, आरोपीविरुद्ध वैजापूर न्यायालयात खुनाचा (कलम ३०२) खटला प्रलंबित आहे, ज्यामध्ये तो जामिनावर आहे. याव्यतिरिक्त, सभाजीनगर (औरंगाबाद) येथील न्यायालयात त्याच्याविरुद्ध आणखी दोन फौजदारी खटले प्रलंबित आहेत.या पार्श्वभूमीवर आणि रेकॉर्डवरील गुन्हेगारी साहित्याचा विचार करून न्यायालयाने प्रथमदर्शनी आरोपी गंभीर गुन्हा करण्याचा प्रयत्न करत असल्याचे मत नोंदवले. आरोपीने यापूर्वी जामिनाच्या अटींचा गैरवापर केल्याचे दिसून येते. त्यामुळे, आरोपीला जामीन मंजूर केल्यास तो पुन्हा अशाच प्रकारचा शारीरिक गुन्हा करू शकतो, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

प्रमुख सत्र न्यायाधीश यांनी आरोपीचा जामीन अर्ज फेटाळण्याचा आदेश दिला. तसेच, गंगापूर आणि वैजापूर येथील पोलीस स्टेशनच्या तपास अधिकाऱ्यांना याबाबत कळवण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्णयामुळे पीडितेला काहीसा दिलासा मिळाला आहे.सदरील प्रकरणात ड.अक्षय मुळे यांना ड.अभिजीत कदम, ड हर्षल बहिर,ड यशवंत जगताप,ड. प्रविण खाडेंनी सहकार्य केले.

### बोगस दानपत्र ...

गुन्हा दाखल झाला.अस्लमबेग मंजुरबेग मिर्झा यास पोलिसांनी अटक केली आहे.या प्रकरणामुळे भूमाफिया यांचेत खळबळ उडाली आहे. याबाबतीत सखोल चौकशी करून संबंधितावर उचित कारवाई व्हावी. जेणेकरून असे प्रकरण पुढे होऊ नयेत.अशी सर्वसामान्यांनी भावना व्यक्त केल्या आहेत.

### मुख्यमंत्री युवा रोजगार...

लेकरा बाळा सह धरणे आंदोलन करून ही शासनाला घाम फुटला नाही. पुढील आदेश नाही मागचे मानधन बाकी जखमेवर मीठ चोळण्याचं काम प्रशासन करीत असल्याने प्रसिद्धीपत्रकाद्वारे त्यांनी शासनाकडे त्वरित लक्ष देण्याची मागणी केली आहे.शासनाने या युवकांच्या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने मानधन अदा करावे, अशी मागणी सर्व स्तरांतून होत आहे.

# तुमचे विचार ओळखा व विचारांना योग्य दिशा द्या कारण तुमचे विचार तुमचे भविष्य घडवतात ?

प्रतिनिधी @ बीड

व्यक्ती जसा विचार करतो तसेच त्याची वागणूक आणि आयुष्यातील घटना ठरत असतात.तुम्ही जे विचार करतात त्याचे प्रतिबिंब असते हे वाक्य किंवा सुविचार नाही तर शाश्वत सत्य आहे मानसशास्त्र व न्यूरो सायकॉलॉजीच्या दृष्टीने विचारांची दिशा हीच आपल्या उज्वल भविष्याची गुरुकिल्ली आहे.प्रत्येक व्यक्ती ला दिवसभरात म्हणजेच २४ तासात ६०,००० ते ७०,००० विचार हे नैसर्गिक रित्या निर्माण होतच असतात याला कोणी थांबू शकत नाही. विचार दोन प्रकारचे असतात एक सकारात्मक आणि दुसरा नकारात्मक जे विचार जास्त करतो त्याची संख्या जास्त आणि त्याचाच विजय होतो. त्यानंतर विचारांमधून म्हणजेच एक मूळ विचार जर आपण पकडला तर एका विचाराच्या पाठीमागे ५५४ हे सूक्ष्म विचार निर्माण होत असतात आणि त्यानंतर एक भावना तयार होत असते, आता तुम्हाला हे प्रश्न पडला असेल की भावना म्हणजे काय ?
तर भावना पण दोन प्रकारच्या असतात, सकारात्मक आणि नकारात्मक
उदा. १.आळस, दुःख, काळजी, इर्शा, द्वेष, टेन्शन ह्या नकारात्मक भावना आहेत., २. आनंद, प्रेम, प्रोत्साहन,उत्साह, मदत, धाडस ह्या सकारात्मक भावना आहेत.आणि जसे विचार तशाच आपल्या भावना असतात. आणि तशीच आपली क्शन म्हणजेच कृती असते. आणि यामधूनच आपल्याला चांगले किंवा वाईट अनुभव येत असतात. आणि या अनुभवावरूनच आपले अस्तित्व ठरत असते. आपले जर चांगले विचार असतील तर नेहमी आनंदी राहून आणि जर आपले नकारात्मक विचार असतील तर आपण सतत दुःखात त्रासात अस्वस्थ इर्षा याच वेदनेत दबावत राहू.
असो तुम्हाला आता समजले असेल की आपले विचार जशी असतात त्याच विचारांची संख्या जास्त होत असते आणि तशाच कृती सुद्धा होत असतात. सतत एकच विचार मधून मेंदूमध्ये विशिष्ट न्यूरल पॅटर्न तयार होत असते नेहमी कामावरील भीती दबाव राग चिंता या विचारांचा आपण पुन्हा पुन्हा नकळत अडकून राहत असू तर त्याचे सर्कल हे मोठे होत असते आणि तशाच कृती सुद्धा होतात हे स्पष्ट आहे.
विचार भावना वर्तन याला कॉग्निटीव्ह बीएविअर थेरेपी या मानसोपचार पद्धती नुसार आपल्या विचारांचा थेट संबंध आपल्या भावनांशी आणि वर्तनाशी असतो. उदा. जर एखादा व्यक्ती असा विचार करत असेल की माझ्याकडून काही चांगले होणारच नाही तर त्याच्यामध्ये



उदासीनता आळस निराशा दुःख त्रास हे नकारात्मक विचार येऊन भावना निर्माण होणारच आहे.
आपल्या विचारांना दिशा देणे
तुमच्या अंतर्मनात नेहमी कोणती विचार आहेत हे सर्वप्रथम ओळखावे लागतील संवाद करत असताना जाणीवपूर्वक लक्ष ठेवावे लागेल नेमके कोणते विचार माझे उज्वल भविष्य घडवत आहेत आणि कोणते विचार मला मागे खेचत आहेत हे ओळखणे अत्यंत आवश्यक असते.
जर तुम्ही नकारात्मक विचारांमध्ये अडकलेले असाल तर
१. सतत चिडचिड करणे
२. रागराग करणे
३ आळसात लोळून राहावंसं वाटणे.
४. हात पाय गळून गेल्यासारखं वाटणे.
५. बारीक ताप येणे.
६.पोटाच्या तक्रारी, केस गळती,डोक जड पडणे.
७.किंवा टाळूमध्ये मुंग्या निघणे
८.सतत भावनिक होऊन रडू येणे
९.कंबर दुखी किंवा बॉडी पेन सतत होणे
१०. सतत सर्दी, ताप येणे
११. चक्कर आल्यासारखे वाटणे.
१२. बी.पी. कमी जास्त होणे.
१३. श्वास जड वाटणे किंवा वेगाने होणे.
१४. सतत झोपेच्या तक्रारी
१५. छातीमध्ये जळजळ होणे.
१६.त्वचेच्या समस्या, सतत बेचेन होणे,
१७. नशिबाला दोष देणे.
१८ दैनंदिन कामामध्ये मन न लागणे किंवा कोणतेच काम करावेसे न वाटणे.
१९. सतत गोंधळलेली मानसिकता असणे.
२०. निर्णय घेताना येणे.
२१.आत्मविश्वास कमी असणे.
जसे सकारात्मक विचार आपले भविष्य घडवतात. तसेच वरील नकारात्मक विचार मानसिक आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत घातक ठरू शकतात.
सतत असुरक्षित, चिंता, दबाव, काळजी, न्यूनगंड यामुळे ट्रेस हार्मोन्स( कॉर्टिसोल) वाढतो. त्याचा परिणाम शरीरावर आणि मनावर होतो. दीर्घकालीन नकारात्मक विचारामुळे नैराश्य,डिप्रेशन, आत्महत्येचे विचार,स्किझोफिनिया अशा मानसिक आजाराला बळी पडू शकतो. जर वरील तुमची समस्या तीन किंवा सहा आठवड्या पेक्षा जास्त असेल तर तुम्ही खूप मोठ्या गंभीर मानसिक व शारीरिक आजाराला बळी पडू शकता.
जर तुम्ही आज एक संकल्प केला की मला या त्रासामधून बाहेर पडून चांगले विचार भावना चांगले आरोग्य यश समाधानी जीवन जगायचं आहे. विचार म्हणजेच आपले अस्तित्व माझ्या अशाच विचारांना दिशा देणे म्हणजेच आपल्या आयुष्याला दिशा देणे, सकारात्मक विचार एक मानसिक गुंतवणूक आहे. जी आपले भविष्य अधिक उज्वल करू शकते. आपले विचार बदलल्याशिवाय आयुष्य बदलत नाही. हे लक्षात ठेवा त्यामुळे तुमचे विचार ओळखा त्यांना योग्य दिशा द्या व आपल्या भविष्याची सुंदर रचना करा तुमचे विचार तुमचे भविष्य घडवतात. जर हे करून विचार बदलत नसतील तर काही थेरपीद्वारे आम्ही तुमच्या विचारांना योग्य दिशा देऊ व त्यातून तुम्ही बाहेर पडू शकता मग वाट कसली बघता खालील नंबर वर कॉल करू शकता.
शब्दांकन...
सायकॉलॉजिस्ट / समुपदेशक
मनीषा बिक्कड (घुले),
९५ ४५ ४४ ०४ ७१.

## बाळराजे दादा पवार जनसेवेत सक्रिय

### बाळराजे दादा जनतेत दाखल होताच नागरिकाची भेटण्यासाठी गर्दी पवार कुटुंबाची प्रमाणितपणा व निष्ठा बाळराजे दादा पवारांनी जनतेत सिद्ध केली

प्रतिनिधी @ गेवराई

गेवराई मतदार संघामध्ये पंडित विरोधी पवार सत्ता समिकरण वर्षानुवर्षे चाललेले आहे गेल्या दोन दशकांमध्ये पवार कुटुंबाला मोठ्या संघर्षातून जीवन जगावं लागलं तरी सुद्धा त्यांनी जनतेची सेवा सुरूच ठेवली असे स्व माधवराव बप्पासाहेब पवार यांचे कुटुंब पवार कुटुंबाचा करता धरता युवा तरुण बाळराजे माधवराव पवार तरुण वयातच एका गुन्हात जेलमध्ये सजा भोगतो आजोबा आमदार वडील आमदार असताना कुठलाच बडे जाऊपना न करणारे प्रमाणिक सच्चे गेवराईचे पाटील म्हणून बाळराजे दादा पवार यांच्याकडे पाहीले जाते बाळराजे दादा पवार यांनी पाहिलेले स्वप्न साखार



करण्यासाठी बंधू लक्ष्मण माधवराव पवार यांनी नगरपालिकेच्या मैदानात उतरुन बाजी पार केली बाळराजे दादा पवार यांच्या फोटो वर जनतेने कित्येक वर्षे नगरपालिकेचे सत्ता पवार कुटुंबाच्या ताब्यात दिली घरातला करता कुटुंबातला तरुण जेलमध्ये असताना कुठलाच चेहऱ्यावर दुःख न ठेवता गेवराईकरांची कुटुंब प्रमाणे या पवार कुटुंबाने सेवा केली याप्रमाणे पडीत राजकारणी घराण्याला २०१४ मध्ये हदरा देत बाळराजे दादा पवार यांच्या विश्वासावर बंधु लक्ष्मण आण्णा पवार यांना मोठ्या मताधिक्याने दोनदा आमदार केले आण्णांनी प्रमाणीक पनाने जनतेची सेवा केली बाळराजे दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली गेवराई तालुक्याचा सर्वांगीण विकास केला गेल्या दोन दशकांनंतर गेवराईचा बाळराजे राजा दादा कायमचा मुक्त झाला असून आता जनतेमध्ये दाखल झाला आहे गेवराई मध्ये बाळराजे दादा पवार यांनी पाऊल टाकताच तालुक्यातील नागरिकांची रीग पवार कुटुंबाच्या घराकडे लागली असून बाळराजे दादा यांना भेटण्यासाठी बोलण्यासाठी फोटो काढण्यासाठी नागरिक उत्सुक आहेत गेवराईकर बाळराजे दादा पवार यांच्या राजकीय भूमिका कडे लक्ष वेधून आहे गेवराई मध्ये पवार कुटुंबाचा दरारा कायम चालेला आहे असा विश्वास नागरिक व्यक्त करत आहेत



बीड - स्वर्गीय शशिकला सुखदेवराव हिंगे यांच्या वर्षश्राद्ध निमित्त अभिवादन करताना नवनाथ अण्णा शिराळे, नवनाथ थोटे, शिवाजी खांडे, अशोक हिंगे इत्यादी

## जालना जिल्हा परिषद समोरील उपोषणकर्ता थोडक्यात बचावला वादळी वाऱ्यामुळे मंडप उडाला

प्रतिनिधी @ जालना

### उप मुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत विभाग जालना उदयसिंग राजपूत बघतात उपोषण कर्त्याची मरणाची वाट

जिल्हा परिषद जालना कार्यालयासमोर मौजे आष्टी ग्रामपंचायत मधील भ्रष्टाचाराच्या विरुद्ध बारा तेरा दिवसांपासून उपोषण सुरु असून दि.१२ सोमवार रोजी दुपारी १ ते २ वाजेच्या सुमारास आलेल्या वादळी वाऱ्यामुळे उपोषण कर्त्याचे मंडप उडून बाजूला पडले असल्याने उपोषण कर्ता भगवान रंगनाथ वाघमारे वादळी वाऱ्याने मंडप पडल्यामुळे घाबरले हा मंडप उडून बाजूला पडल्याने उपोषण कर्ता बाल बाल बचावले जर मंडप उपोषण कर्त्याच्या अंगावर पडला असता तर या वादळी वाऱ्यामुळे उपोषण कर्त्याची बरीच फजिती झाली.सध्या वातावरणात बदलत असल्याने जर एखाद्या वेळेस वादळी वाऱ्यासह गारपीट किंवा दमदार पाऊस झाला तर उपोषण कर्त्याची काय अवस्था होईल जालना जिल्हा परिषद कार्यालयासमोर मौजे आष्टी ग्रामपंचायत मध्ये झालेल्या लाखो रुपयांच्या भ्रष्टाचारा विरुद्ध बारा तेरा दिवसांपासून उपोषण सुरू असून उपोषण



कर्त्याची प्रकृती खालावली आहे तरी पण गेंड्याच्या कातडीचे जिल्हा परिषद चे उप मुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत विभाग उदयसिंग राजपूत जाणून बुजून दुर्लक्ष करत आहेत जिल्हा परिषद जालना समोर बारा तेरा दिवसांपासून उपोषण कर्त्याची उप मुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत विभाग उदयसिंग राजपूत हे का उपोषण कर्त्याची बघतात मरणाची वाट वादळी वाऱ्यामुळे मंडप उडाले उपोषण कर्त्याची झाली दैना तरी पण गेंड्याच्या कातडीचा अधिकारी उदयसिंग राजपूत लक्ष नाही देईना असे उपोषण कर्ते भगवान रंगनाथ वाघमारे यांनी सांगितले

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शिक्षिकेला पालकांनी दिली चक्क स्कुटी मोटारसायकलं

प्रतिनिधी @ अकोले

नवलेवाडी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेच्या शिक्षका सुमन गणपत खतोडे यांचा गुणगौरव सोहळा पालकांनी आयोजित केला. त्यामध्ये विध्यार्थी व पालक यांनी शिक्षिकेला चक्क स्कुटी मोटारसायकलं सप्रेम भेट दिली आहे.
अकोले येथे आयोजित कार्यक्रमात आमदार डॉ. किरण लहामटे यांचे हस्ते व राजूर महाविद्यालय चे माजी प्राचार्य विलास नवले यांच्या अध्यक्षतेखाली केला होता. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्ष श्री के. डी. धुमाळ, गटशिक्षणाधिकारी अरविंद कुमावत, शिक्षण विस्तार अधिकारी अकोले माधवराव हासे, शिक्षण विस्तार अधिकारी मवेशी बीट बाळासाहेब दोरगे, केंद्रप्रमुख नवलेवाडी सुनील नरसाळे, शिक्षक श्री विक्रम गायकर यांच्या उपस्थितीत इयत्ता चौथीचे सर्व विद्यार्थी व पालक आणि शिक्षक वृंद नवलेवाडी यांनी या गौरव सोहळ्याचे



आयोजन केले.
नवलेवाडी शाळेत चौथीच्या विध्यार्थ्यांच्या शिक्षका श्रीमती सुमन गणपत खतोडे यांच्या शिकवण्याच्या अनोख्या पद्धतीने व विध्यार्थ्यांना आपलेसे करण्याने तसेच त्यांनी केलेल्या अथक परिश्रमाने व मेहनतीने इयत्ता चौथीतील सर्व मुलांनी जिल्हास्तर व राज्यस्तरावर विविध स्पर्धा परीक्षांमध्ये नाविन्यपूर्ण यश मिळविले. अनेक विध्यार्थी यशाचे मानकरी ठरले त्यामुळे सर्व पालकांनी त्यांना ज्युपिटर स्कूटी भेट दिली.
आमदार डॉ किरण लहामटे यांनी या विध्यार्थी प्रिय शिक्षकेच कौतुक केले. चांगल काम केल तर पालक पण शिक्षकांचा गौरव करतात अस अनोख उदाहरण आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुजाता सहाणे यांनी केले तर सत्कारमूर्तींचे परिचय ओळख कविता आरोटे यांनी केले तसेच आलेल्या पाहुण्यांचा सत्कार सोहळा डॉ. निलेश सहाणे यांनी केला मुलांचे व पालकांचे मनोगत झाले. या सर्व कार्यक्रमाचे आभार श्री महेश शेटे सर यांनी केले. कार्यक्रम साठी सचिन वाकचौरे, सचिन पापळ, अमोल वाकचौरे, संतोष कडलग पालकांनी सहकार्य केले.

## सतरा वर्षांपूर्वी विखुरलेल्या पाखरांनी पुन्हा एकदा भरविला दहावी चा वर्ग

प्रतिनिधी @ मानुर

शिरूर कासार येथील कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय या ठिकाणी २००८ साली इयत्ता दहावीच्या वर्गामध्ये शिकत असलेल्या मित्र-मैत्रिणींचा गेट-टुगेदर चा कार्यक्रम या ठिकाणी ११/०५/२०२५ रोजी पार पडला.शाळा व महाविद्यालयीन जीवनामध्ये विद्यार्थी म्हणून आयुष्याला आकार देण्यासाठी एकवटलेली निरागस जीव आयुष्याच्या पुढच्या लढाईमध्ये वेगवेगळ्या मार्गाने विभक्त होत असतात सातत्याने एक दोघांची भेट होत असते परंतु एकत्र शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे मित्र-मैत्रिणींचे पुन्हा भेट व्हावी याकरता अलीकडच्या काळात गाजलेला माजी विद्यार्थी मेळावा म्हणजेच गेट-टुगेदर या कार्यक्रमाच्या माध्यमातून हा विखुरलेला परिवार एका ठिकाणी जमा होतो त्यावेळी झालेला आनंद हा शब्दात व गगनात न मावणारा असतो.
त्याचप्रमाणे या कार्यक्रमांमध्ये २००८ सालीचे शिक्षक यावेळी आवर्जून उपस्थित राहिले होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष कालिका देवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य सन्माननीय आप्पासाहेब येवले सर त्याचप्रमाणे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले सुधाकर खोले सर, च.थ.जायभाय सर, रवींद्र बडे सर, अंबादास बडे सर त्याचप्रमाणे सर्वांच्या आवडीचे असणारे श्रीहरी येडे सर हे देखील या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते प्रमुख अतिथी व कार्यक्रमाचे अध्यक्ष यांच्या उपस्थितीत दिपप्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली यावेळी कार्यक्रमाचे स्वागत गीत मनीषा शेलार यांनी गायले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उमा गायके व स्नेहा तांबट यांनी केले व प्रस्तावना अश्विनी रणखांब यांनी केले.या कार्यक्रमाचे आयोजक श्री.राम कोकाटे, अरविंद फरताडे, संकेत थोरात, प्रतीक भांडेकर आदींनी केली होती यावेळी उपस्थित वर्गातील असलेले स्नेहल सव्वाशे, अश्विनी रणखांब, गीतांजली तांबे, उमा गायके , ज्योती येवले, कोमल



फुलभटी, स्नेहा तांबट, अश्विनी फुलथे, रितू वाघमारे, शाईन शेख, अंबिका गिरी. संकेत थोरात ,दीपक केरकळ ,वैभव शेलार ,पंकज पावशे ,राम कोकाटे
,सुनील पवार ,अमोल बर्डे ,इसाक शेख ,राम सव्वाशे ,अभिजीत गाडेकर ,स्वप्निल खोले ,भाऊसाहेब मुळीक ,निलेश उगलमुगले ,आबासाहेब मुखेकर,अरविंद फरताडे ,अमोल ढाकणे ,ईश्वर सानप ,नितीन ढाकणे ,राज नेटके ,अमोल गायकवाड ,वैभव गाडेकर ,दादासाहेब मोरे, प्रकाश सव्वाशे ,,अशोक मोरे, केशव कदम ,संतोष चव्हाण ,गौरव पाटील, नितीन जायभाय
निलेश भारती .सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. यावेळी अध्यक्षांचे मनोगत व्यक्त केले सर्व शिक्षक वृंदांनी विद्यार्थ्यांसाठी मोलाचे मार्गदर्शन करून भावी आयुष्याची वाटचाल कशी करावी हे सर्व सांगून कार्यक्रमाची सांगता झाली.

## पाणी आडवणे-साठवणे, तलावांचे पुनरुज्जीवन करणे काळाची गरज - पुरुषोत्तम वायळसर

प्रतिनिधी @ जाफ्राबाद

जाफ्राबाद तालुक्यातील डोलखेडा येथे दि ८.०५.२०२५ रोजी जलताराचे जनक श्री पुरुषोत्तम वायाळ सर यांनी डोलखेडाबु येथे पाण्यासंदर्भात पाणी अडवण्याचे तंत्र व त्याच्यापासून जमिनीची झिज न होता भूगर्भातील पाणी पातळी कशी भरवून काढता येईल यासंदर्भात मोलाचे मार्गदर्शन केले व जास्त जमीन न गुंतवता व जमिनीतील चिभडेपणा दूर करून जल स्रोत कसा उंचावल्या जाईल आणि बारमाही ओलिताखाली सकसा जमीन कसी आनता येईल बारमाही ओली ता खाली कसे आणता येईल याबद्दल वायाळ सर यांनी खुप मोलाचे असे मार्गदर्शन केले.
शेतकऱ्यांना त्यांनी खूप अशी उदाहरणे देऊन पाण्याचे महत्व व येणाऱ्या काळात पाण्याची समस्या कशी सोडवल्या जाईल याबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले व तसेच त्यांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन स्वतःच्या हाताने चुना



टाकून लाईन दोरी लावून जेसीबीच्या साहाय्याने गड्डे करून प्रत्यक्षात दगड टाकून दाखवले व गावकऱ्यांना प्रोत्साहित करून येणाऱ्या काळात पाणी समस्या पासून सोडवण्याचे मार्गदर्शन केले यावेळी उपस्थित तालुका कृषी अधिकारी अमोल शिंदे साहेब तसेच गावचे सुपुत्र उपजिल्हाधिकारी राष्ट्रीय महामार्ग विजय राऊत व माजी शिक्षणाधिकारी अशोक राऊत सरपंच विनोद राऊत तसेच विलास पाटील राऊत मदनराव नवले सखाराम डोळस मोठ्या संख्येने गावकरी मंडळी उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांचा गुंडगिरी करणाऱ्याला दणका !

## बीड जिल्हयातील चार गुंडाची एकाच दिवशी एमपीडीए कायद्याअंतर्गत हर्सूल कारागृहात रवानगी

प्रतिनिधी @ बीड

बीड जिल्ह्यातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी जिल्हयाची पुरा सांभाळल्या पासुन शथीचे प्रयत्न चालवले आहेत त्यांना बीड जिल्ह्याचे नवनियुक्त जिल्हाधिकारी मा. श्री. विवेक जॉन्सन यांची खंबीर साथ लाभली आहे. बीड जिल्ह्यातील गुंडगिरीचे व गुन्हेगारीचे व बाळु माफीयांचे समुळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून MPDA व MCOCA कायद्या अंतर्गत बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडावर कार्यवाही करण्याचे योजिले आहे. त्या अनुषधाने पोलीस अधीक्षकांच्या सुचनेवरुन प्रभारी अधिकारी ।. पो.नि. पो.स्टे. माजलगावं शहर यानी दि. ०१.०४.२०२५ रोजी इसम नामे तारेख खान मुसा खान वय २८ वर्षे रा. फुलेनगर, माजलगावं (धोकादायक व्यक्ती) २. स.पो.नि. पो.स्टे. वडवणी यांनी दि. १८.०३.२०२५ रोजी इसम नामें विशाल माणिक डांबे वय २४ वर्षे रा. बाहेगव्हाण ता. वडवणी (धोकादायक व्यक्ती) ३. पो.नि. पो.स्टे. अंबाजोगाई ग्रामीण यांनी दि. ०६.०३.२०२५ रोजी इसम नामे गजाजन सुभाष जाधव वय ३८ वर्षे रा. राडी तांडा ता. अंबाजोगाई (बुटलेगर) ४. पो.नि.पो.स्टे. शिवाजीनगर यांनी दि. ०९.०४.२०२५ रोजी इसम नामे गणेश भारत गिरी वय २३ वर्षे रा. इंद्रप्रस्थ कॉलनी, नगर रोड, बीड (धोकादायक व्यक्ती) यांचे विरुध्द MPDA कायद्याअंतर्गत स्थानबद्ध करण्याबावतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक बोड यांच्या मार्फतीने मा. जिल्हादंडाधिकारी साहेब बोड यांना सादर केला होता.

सदर स्थानबध्द इसम क्रमांक। याचे विरुध्द पो.स्टे. माजलगांव शहर येथे जिवे मारण्याचा प्रयत्न करणे, गंभीर दुखापत करणे, शिवीगाळ करणे, जिवे मारण्याच्या धमक्या देणे, रस्ता आडवुण मारहाण करणे, बोरी करणे, गैर कायदयाची मंडळी जमविणे या व अशा गंभीर स्वरुपाचे एकुण ०८ गुन्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. सदर व्यक्तीने आपले चर्तन सुधारावे या करीता त्याचे वर BNSS १२६ प्रमाणे यापूर्वीच प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली होती तसेच उपविभागीय दंडाधिकारी माजलगांव यांनी सदर इसमास यापूर्वी कलम ५६(१) मपोका प्रमाणे तडीपार केले होते.

सदर स्थानबध्द इसम क्रमांक २ याचे विरुध्द पो.स्टे. वडवणी येथे मारहाण करणे, मुलीची छेडछाड करणे, शिवीगाळ करणे, जिवे मारण्याच्या धमक्या देणे, गैर कायदयाची मंडळी जमविणे, जबरी चोरी करणे, बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदयाचे उल्लंघन करणे या व अशा गंभीर स्वरुपाचे एकुण ०५ गुन्हयांची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. सदर व्यक्तीने आपले वर्तन सुधारावे या करीता त्याचे वर CrPC ११० प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली होती व पोलीस अधीक्षक बीड यांनी यापुर्वी सदर इसमास कलम ५५ मपोका प्रमाणे ०१ वर्षा करीता बीड जिल्हयाच्या हद्दीतुन हद्दपार केले होते.

सदर स्थानबध्द इसम क्रमांक ३ याचे विरुध्द पो.स्टे. अंबाजोगाई ग्रामीण येथे हातभट्टीची दारु तयार करणे, वाहतक करणे, ताब्यात बाळगणे, बेकायदेशीररीत्या हातभट्टीच्या दारुची विक्री करणे, या व अशा स्वरुपाचे एकुण ०५ गुन्हयांची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. सदर व्यक्तीने आपले वर्तन सुधाराने या करीता त्याचे वर म.दा.का. चे कलम ९३ प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली होती.

सदर स्थानबध्द इसम क्रमांक ४ याचे विरुध्द पो.स्टे. शिवाजीनगर, बीड शहरात खंडणी मागणे, वाहनांची तोडफोड करुन नुकसान करणे, जाळपोळ करणे, दुखापत करण्याच्या उद्देशाने मारहाण करणे, रस्ता आडविणे, जिवे मारण्याच्या धमक्या देणे, दंगा करणे, गैरकायदयाची मंडळी जमवुन दुखापत करणे, धार्मीक भावना दुखावने, जातीवाचक शिवीगाळ करणे या व अशा गंभीर स्वरुपाचे एकुण ०४ गुन्हयांची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. सदर व्यक्तीने आपले वर्तन सुधारावे या करीता त्याचे वर CrPC ११० प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली होती.

सदरील चार ही इसम हे शरीराविरुध्दचे व मालाविरुध्दचे तसेच हातभट्टी दारु विषयक गंभीर स्वरुपाचे गुन्हे करण्याच्या सवईचे असल्याने पोलीसांची त्यांचेवर बऱ्याच दिवसांपासून करडी नजर होती. तसेच सदर चार ही इसमांनी आपले वर्तन सुधारावे म्हणून यापुर्वी त्यांचेवर कलम ५५, ५६(१) मपोका, CPC ११०, १२६ BNSS, ९३ मदाका प्रमाणे वेळोवेळी त्यांचेवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. परंतु सदर इसम हे प्रतिबंधक कारवाईस न जुमानता पुन्हा चहत्या क्रमाने गंभीर स्वरुपाचे गुन्हे करण्याचे चालूच ठेवून होते. त्यांची माजलगावं, वडवणी, अंबजोगाई व बीड शहरात व परीसरात प्रचंड दहशत आहे. त्यांचे विरुध्द सर्व सामान्य लोक फिर्याद अधवा साक्ष देण्यास समोर येत नाहीत ते सर्वसामान्य लोकांना व व्यापाऱ्यांना त्रास देवून दहशत निर्माण करून गुन्हे करत होते.

सदर प्रकरणात श्री. विवेक जॉन्सन नवनियुक्त जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी बीड यांनी दिनांक ११.०५.२०२५ रोजी सदर प्रकरणाच्या अनुषंगाने एम.पी.डी.ए. कायद्याअंतर्गत आदेश पारीत करून बीड जिल्ह्यातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधीत राहावी हा उक्त दृष्टीकोन डोळयासमोर ठेऊन सदर चार ही इसमास तात्काळ ताब्यात घेवून हर्मुल कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे हजर करून स्थानबध्द करणे बाबत आदेश पारीत केले होते. त्यानंतर पोलीस अधिक्षक बीड यांनी सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून कार्यवाही करण्याच्या सुचना संबधित पो.स्टे. प्रभारी अधिकारी व पो.नि. स्थागुशा बीड यांना दिल्या होत्या. सदर आदेशावरुन पो.नि. स्थागुशा यांनी ताबे पोलीस अंमलदार यांचे मार्फत सदर इसमा पैकी अनु क्र. १ व ३ यांना दि. ११.०५.२०२५ रोजी ताब्यात घेऊन संबंधीत पो.स्टे. ला हजर केले. संबधीत पो.स्टे. ने नमूद इसमांना हार्मुल कारगृह येथे हजर केले आहे. अनु क्रमांक २ यास दि. १२.०५.२०२५ रोजी पुणे येथुन स्थामुशा ने ताब्यात घेऊन पो.स्टे. वडवणी येथे हजर करुन स्थानबध्द करण्याची प्रक्रिया सुरु आहे. अनु क्र.४ हा सध्या बीड न्यायालयीन कोठडीत असुन पुढील कारवाई करण्याचे योजीले आहे. यातील सर्व प्रस्तावित स्थानबध्द इसम हे स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांनी पकडलेले आहेत.

धडाकेबाज कारवाई यांनी केली...

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत (भापोमे), अपोअ बीड श्री. सचिन पांडकर, अपोअ अंबाजोगाई श्रीमती चेतना तिडके, उपविपोअ श्री. अनिल चोरमले, श्री विश्वांभर गोल्डे यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. श्री उस्मान शेख स्थागुशा बीड, शिवाजी बंटेवाड, पो.नि. मारुती खेडकर, पो.नि. राहुल सुर्यतळ, पो.नि. श्री. संतोष पोडके व स.पो.नि. अमन शिरसठ, सपोनि रंगनाथ जगताप, पोउपनि केरबा माखने, पोह/कल्याण देशमाने, किसन पोळवे, जगजीवन करवंदे, अरुण राऊत, शुभम राऊत, माधव तोटेवाड, विलास खरात, परझने, कांदे, स्थागुशाचे पोउपनि श्री. श्रीराम खटावकर, सुशांत सुतळे, महेश विप्ने, तुळशिराम जगताप, सपोउपनि अभिमन्यु औताडे, पोह अशोक दुवाले, सोमनाथ गायकवाड, जफर पठाण, बाळकृष्ण जायभाये, कैलास ठोंबरे, महेश जोगदंड, गणेश मराडे, पोअं/अर्जुन यादव, मांजरे, बप्पासाहेब घोडके, चालक खवतड नेमणुक स्थागुशा बीड यांनी केलेली आहे. भविष्यातही वालुवा चोरटा व्यापार करणारे, अवैध गुटका विक्री करणारे तसेच जिवनावश्यक वस्तुंचा काळाबाजार करणारे व्यक्ती व जातीय तथा धार्मीक तेढ निर्माण करणारे समाजकंठक यांचेवर व दादागिरी करणाऱ्या, खंडणी बहादर धोकादायक गुंडावर जास्तीत जास्त MPDA व MCOCA कायदयाअंतर्गत कठोर कारवाई करण्याचे संकेत पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कोवत (भापोसे) यांनी दिले आहेत.

## श्री नारदस्वामी विद्यामंदिर येथे माजी विद्यार्थी मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न

### माजी विद्यार्थ्यांनी दिला जुन्या आठवणींना उजाळा!




प्रतिनिधी @ बीड

लहानपणी नकोशी वाटणारी शाळा नंतर मात्र हवीहवीशी वाटते. याचा प्रत्यय रविवारी दि. ११ मे रोजी बीड शहरातील नवा मोंढा परिसरात असणाऱ्या श्री नारदस्वामी विद्यालयात झालेल्या माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्यात आला. जवळपास २३ वर्षांनंतर एकत्र आलेल्या या शालेय मित्रांनी शाळेत असताना केलेल्या गमती-जमती, शिक्षकांनी केलेली शिक्षा, अशा अनेक आठवणींना उजाळा दिला. श्री नारदस्वामी विद्यालयाच्या या माजी विद्यार्थी मेळावा कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री बडेबाबा शिक्षण प्रसारक मंडळ लहुरी संस्थेचे संचालक श्री प्रसादजी संपतराव खांडेकर हे होते. तर व्यासपीठावर प्रमुख पाहुणे श्री चौरे सर, श्री. कागदे सर आणि श्री. शिरसट सर,श्री शेंडगे सर आदी उपस्थित होते.

बीड शहरातील नवा मोंढा परिसरात असणाऱ्या श्री नारदस्वामी विद्यामंदिर या शाळेत रविवार दिनांक ११ मे २०२५ रोजी शाळेत २००२ मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांपासून ते २०२४ या शैक्षणिक वर्षात शाळेतून दहावी पास झालेल्या एकूण २३ वर्षांच्या काळातील माजी विद्यार्थ्यांचा मेळावा झाला. या मेळाव्याचे उद्घाटन संस्थेचे संचालक श्री प्रसादजी संपतराव खांडेकर यांनी केले. या स्नेह मेळाव्यासाठी विद्यालयाचे मागील तेवीस वर्षातील सर्व विद्यार्थी एकत्र जमले होते. सध्या विविध क्षेत्रात कार्यरत असलेले विद्यार्थी या वेळी एकत्र आल्याचा आनंद सर्वांच्या चेहऱ्यावर दिसून येत होता. धकाधकीच्या आयुष्यात प्रत्येक जण आपापल्या कामात गुंतलेला असला तरी पण श्री नारद स्वामी विद्यालयाची आठवण कायम येत असल्याचे प्रत्येक विद्यार्थी बोलून दाखवत होता. या वेळी सर्व विद्यार्थी लहान होऊन शाळेमध्ये रमले होते, या वेळी सर्व विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील जून्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी त्यांनी छड्या ही खाल्ल्या. हसत खेळत संपूर्ण दिवस कसा गेला हे कोणालाच कळले नाही. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. कागदे सर आणि श्री. शिरसट सर यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि सर्वतोपरी सहकार्य लाभले. तसेच संस्थेचे कर्मचारी श्री. राठोड यांचेही सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या सुयोग्य नियोजनिकरीता सचिन बुरांडे, ज्ञानेश्वर बामदळे, देवेंद्र सोनवणे सोमनाथ भोसले यांनी विशेष परिश्रम घेतले व त्यांना बाकी सर्व विद्यार्थी मित्रांनी सहकार्य केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार नारायण महानोर यांनी मानले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात कार्यरत असलेले श्री नारदस्वामी विद्यामंदिर या शाळेचे विद्यार्थी कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

## लातूरात भगवान बुद्ध जयंती साजरी, भव्य धम्म मिरवणूकिणे सर्वांचे लक्ष वेधले

### युद्ध नको बुद्ध हवा - पु. भिक्खू पय्यानंद थेरो

प्रतिनिधी @ लातुर




विश्वशांतीचे अग्रदूत, महामानव तथागत भगवान बुद्ध यांची जगभरात जयंती साजरी होत असताना. लातूर शहरामध्ये देखील बुद्ध जयंती निमित्त बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्ट, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती व सर्व उपासक-उपासिकांच्या च्या संयुक्त विद्यमाने पु. भिक्खू पय्यानंद थेरो यांच्या मार्गदर्शना खाली भव्य बुद्ध जयंती धम्म मिरवणूक संपन्न झाली. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, नांदेड रोड, लातूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून विविध नगरातील समाजातील ज्येष्ठ भगिनींच्या हस्ते धम्म ध्वजारोहण करून भगवान बुद्ध मूर्ती सहित भिक्खू संघ, श्रामणेर संघ, उपासक उपासिकांसह भव्य धम्म मिरवणूकिस प्रारंभ करण्यात आला. या धम्म मिरवणुकीत श्रामणेर संघ, उपासक-उपासिका, तरुण वर्ग, महिला मंडळे, शाळा व महाविद्यालयांचे विद्यार्थी सहभागी झाले होते. सर्वजण पांढऱ्या व वस्त्रधारी पोशाखात आणि हातात पंचरंगी धम्मध्वज घेऊन चालत होते.

या उपक्रमांमुळे धम्म मिरवणूक एक चलतं-फिरतं बौद्ध शिक्षण केंद्र वाटत होते.या भव्य धम्म मिरवणुकीमुळे समाजात बौद्ध धम्माचे मूल्य आणि भगवान बुद्धांनी दिलेले शांती व समतेचे संदेश पुन्हा एकदा लोकांच्या मनामध्ये जागृत झाले.

भगवान बुद्धांच्या जयंती निमित्त निघालेली ही धम्म मिरवणूक केवळ एक धार्मिक परंपरा नसून, ती सामाजिक परिवर्तनाचा एक सशक्त माध्यम ठरते. अशा मिरवणुकींमधून नव्या पिढीला बौद्ध धम्माचे विचार व मूल्ये आत्मसात करण्याची प्रेरणा मिळते. तद्नंतर विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे, बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पु. भिक्खू पय्यानंद थेरो सुशीलकुमार चिकटे, डॉ. विजय अजनिकर, संजय सोनकांबळे, ड. रमक जोगदंड, मिलिंद धावारे, आशा चिकटे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून, तथा पु. भिक्खू पय्यानंद थेरो यांच्या हस्ते मुख्य धम्म ध्वजारोहन करून, त्रिसरण पंचशीला सह, धम्म ध्वज गाथेने या भव्य दिव्य धम्म मिरवणुकीचा समारोप करण्यात आला.पुढे बोलताना पु. भिक्खू पय्यानंद थेरो तथागत भगवान बुद्ध जयंतीचा शुभेच्छापर संदेश देताना म्हणाले कि आजचा जगभरातील सामाजिक, राजकीय आणि आर्थिक परिस्थितीचा आढावा घेतला तर ठिकठिकाणी युद्ध, हिंसा, दहशतवाद, अराजकता आणि असहिष्णुतेचे वातावरण आहे. मानवजातीला शांततेची, समतेची आणि करुणेची गरज आहे. अशा काळात जगाला युद्ध नको, बुद्ध हवा असे वक्तव्य पुज्य भिक्खू पय्यानंद थेरो यांनी या वेळी केले.या वेळी प्रा. अनंत लांडगे, डी. एस. नरसिंगे, प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे,प्राचार्य डॉ. संजय गवई,पृथ्वीराज शिरसाठ,पांडुरंग अंबुलगेकर,केशव कांबळे,डॉ. विजय अजनिकर, लाला सुरवसे, भीमराव चौदंते, करण ओव्हाळ, डॉ. अरुण कांबळे, ॲड. गणेश कांबळे, राहुल शाक्यमूणी, अनिरुद्ध बनसोडे, उदय सोनवणे, ज्योतीराम लामतुरे, कुमार सोनकांबळे,विजय चौधरी,बालाजी कांबळे.वैभव गायकवाड,आकाश सरवदे,डॉ. अरुण कांबळे, रुपेश गायकवाड, नितीन पडसाळे, सिद्धार्थ सूर्यवंशी, विनोद कोल्हे,शिला वाघमारे,निर्मला थोटे, पंचशीला बनसोडे,स्वाती सूर्यवंशी, शारदा लामतुरे, बेबीताई कांबळे, शकुंतला नेत्रगावकर, सरिता बनसोडे, कविता धावारे,प्रतिष्ठित मान्यवर, डॉक्टर, वकील, विविध महिला मंडळे, विद्यार्थी विद्यार्थिनीसह,हजारो उपासक उपासिकांची उपस्थिती होती.

## सुभाषराव गायगवे यांचे निधन

प्रतिनिधी @ माजलगांव

येथील तेलाचे प्रतिष्ठित व्यापारी सुभाषराव अण्णा गायगवे (वय ६८) यांचे अल्पशा आजाराने दि.१० मे रोजी दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर दिनांक ११ मे रोजी सकाळी ८ वाजता मंगलनाथ स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.सुभाषराव अण्णा गायगवे हे अत्यंत मनमिळावू शांत धार्मिक वृत्तीचे होते.आडत व्यापारी तेलाचे व्यापारी म्हणून सर्वत्र परिचित होते.गजानन गणेश मंडळाचे हे संस्थापक सदस्य होते.कुणाच्याही सुख दुःखात सहभागी होणारे व्यक्तिमत्व म्हणून सर्वत्र परिचित होते.सामाजिक कार्याची त्यांना आवड होती. त्यांचे अल्पशा आजाराने काल दि.१० मे रोजी दुपारी राहत्या घरी दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या पार्थ यावर आज दि.११ मे रोजी सकाळी ८ वाजता मंगलनाथ स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी,दोन भाऊ,दोन बहिणी,दोन मुले,दोन मुली, सुना नातवंडे असा परिवार आहे.

## भगवान विद्यालयात इयत्ता दहावी २००५ च्या विद्यार्थ्यांचा स्नेहमिलन व गुरुपूजन सोहळा संपन्न

प्रतिनिधी @ बीड

भगवान विद्या प्रसारक मंडळ बीड संचलित भगवान विद्यालयांमध्ये इयत्ता दहावीच्या २००५ विद्यार्थ्यांचा स्नेहमिलन व गुरुपूजन सोहळा दि. ११/५/२०२५ रविवार रोजी सकाळी ठीक ११:०० वाजता विद्यालयात करण्यात आला होता.याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री अंकुशराव आघाव सर हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तर प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त ज्येष्ठ शिक्षक श्री वाय.एस.भोंडवे सर, श्री दिलीपराव मोराळे सर, शाळेचे पर्यवेक्षक श्री विजय ढोकर सर व श्री डी.पी. डोळे सर यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी कै. गुरुवर्य भा.वा. सानप सर, सरस्वती माता व कै. सातपुते सर यांच्या प्रतिमेचे पूजन करून मंचावरील मान्यवरांच्या स्वागत सोहळ्यानंतर उपस्थित विद्यार्थ्यांची हजेरी वर्गशिक्षक पदाची धुरा सांभाळून श्री डोळे सरांनी घेतली. त्यानंतर सर्व उपस्थित माजी विद्यार्थ्यांचा गुलाब पुष्प देऊन यथोचित सन्मान विद्यालयाच्या वतीने करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी स्वतःच्या परिचयासह कौटुंबिक माहिती विशद केली.

विद्यालयातील दिवंगत शिक्षक व मुख्याध्यापक यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करून विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त करून गुरुजनां प्रति ऋण निर्देश व्यक्त केला. विचार मंचावरून सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन स्नेह मिलन सोहळा आयोजित केल्याबद्दल विद्यार्थ्यांना धन्यवाद दिले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी चि.पाळवदे, श्री प्रमोद राठोड, श्री विशाल मोहिते, डॉक्टर अभिलाषा तिडके व सर्व विद्यार्थी यांनी अतोनात परिश्रम घेतले. सामूहिक राष्ट्रगीत गाऊन स्नेह भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## खरीप हंगामपूर्व आढावा बैठक पंचायत समिती अंबड येथे आ.नारायण कुचे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न



प्रतिनिधी @ अंबड

तालुक्याची खरीप हंगामपूर्व आढावा बैठक पंचायत समिती सभागृह अंबड येथे आमदार श्री नारायण कुचे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली, याप्रसंगी भारत पाकिस्तान युद्धामध्ये शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली, व अंबड तालुक्यातील प्रगतशील शेतकरी बांधवांचा सत्कार आमदार नारायण कुचे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी अंबड कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती अवधुत नाना खडके, अंबड तहसीलदार विजय चव्हाण साहेब, भाजपा बदनापूर तालुका अध्यक्ष भगवान मात्रे, पंचायत समिती गट विकास अधिकारी राजपूत साहेब, उपविभागीय कृषी अधिकारी रोडगे साहेब, अंबड तालुका कृषी अधिकारी गंडे साहेब, ज़ि प स डॉ नंदकिशोर पिंगळे, श्रीराम नागरे, राहुल डोंगरे, सतीश ढवळे, पंचायत समिती सदस्य भगवान भोजने, परमेश्वर लेंभे, संजय जाधव, डॉ रामकिसन जाधव, नंदु पाटील, सर्व विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.



## केज तालुक्यातील गदळेवाडी येथे वीज पडून गाईचा मृत्यू, अवकाळी पावसाने फळबागांचेही नुकसान

प्रतिनिधी @ केज

केज तालुक्यातील गदळेवाडी येथे विज पडुन गायीचा मृत्यू झाला आहे.दिनांक १२ मे २०२५रोजी सोमवारी दुपारी दोन वाजता अचानक वारे बदलले सुसाट वारे सुटले व भर दुपारी विजेच्या कडकडाटासह तुफान वादळ सुटले पाऊस कमी व वादळ आणि विज यांचा कडकडाट मोठ्या प्रमाणात होता. यावेळी झाडे उन्मळून पडली तसेच बहुतांश घरावरील पत्रे उडून गेली.तसेच आंब्याचे व फळबागाचे ही मोठे नुकसान तसेच शेतकऱ्यांनी कडबा गोळा केलेला उडून गेला शिरुरघाट, गदळेवाडी,नांदुरघाट व परिसरात अवकाळी पावसाने मोठा तडाखा दिला यावेळी नांदूरघाट पासून पाच किलोमीटर अंतरावर असणाऱ्या गदळेवाडी येथे वीज गायीवर पडली. गदळेवाडी येथील शेतकरी महादेव जालिंदर गदळे यांच्या गायीवर वीज पडल्याने शेतकऱ्यांनी हंबरडा फोडला यावेळी डॉक्टर यांनी तपासणी करून गाईचे पोस्टमार्टम रिपोर्ट केला.दावणीला लक्ष्मी असणारी गावरान गाय गेल्याने शेतकऱ्यांनी हंबरडा फोडला या शेतकऱ्याला आता आधाराची गरज आहे यावेळी परिसरात ही खूप मोठे नुकसान झाले तात्काळ केज तहसीलदार यांनी तलाठी यांना आदेश देऊन पंचनामे करण्याचे आदेश द्यावेत व नुकसान भरपाई मिळावी यासाठी प्रयत्न करावेत अशी मागणी केली.

नांदुर घाट परिसरात वीज कोसळली तसेच वादळी वाऱ्याने मोठे नुकसान झाले त्याच बरोबर केज तालुका व बीड जिल्ह्यात वादळी वारा व पाऊस यामुळे बऱ्याच ठिकाणी मोठे नुकसान झाले आहे ज्या ठिकाणी शेतकऱ्यांचे नुकसान झाले तसेच जनावरांची जीवित हानी झाली त्या ठिकाणी तात्काळ पंचनामे करून त्या शेतकऱ्यांना मदत देउन शासनाकडून आधार देण्याचे काम संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ करावे त्या अनुषंगाने पत्र देऊन तात्काळ पंचनामे करावेत असे देखील सूचना करण्यात येतील.असे खा.बजरंग सोनवणे यांनी सांगितले आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अँड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बँक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# पाथरी तालुक्यातील सर्व शिवप्रेमीसाठी आज ऐतिहासिक दिवस -सईद खान

प्रतिनिधी @ पाथरी

मागील ३५ वर्षापासून सर्व पाथरीकरांचे एकच स्वप्न होते की पाथरी येथील सेलू कॉर्नर येथे जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभा राहावा,यासाठी आम्ही खूप प्रयत्न केले त्यामध्ये खूप अडचणी आल्या परंतु आम्ही हार मानली नाही आणि आज शेवटी ते स्वप्न पूर्ण होताना दिसत आहे. त्याचेच फलित म्हणून सेलू कॉर्नर येथील भव्य दिव्य पुतळा बसवण्यासाठी पुतळा विकास कामाचे भूमिपूजन माझ्या हस्ते करण्यात येत आहे, यापेक्षा मोठे भाग्य कोणते असू शकते. असे प्रतिपादन शिवसेना अल्पसंख्यांक प्रदेशाध्यक्ष सईद खान यांच्या वतीने जमलेल्या शिवप्रेमींना संबोधित करत असताना करण्यात आले.

यावेळी माजी नगराध्यक्ष ड. मुंजाजी भाले पाटील,माजी जिल्हा परिषद सदस्य चक्रधर उगले,माजी पंचायत समिती सदस्य एकनाथ शिंदे इत्यादींनी आनंद व्यक्त करत सईद खान यांच्यावर स्तुती सुमने उधळली आणि महाराज कसे अठरापगड पगड समाजाचे जाणते राजे होते याचा इतिहास सांगितला.

यावेळी व्यासपीठावर असेफ खान,लालू खान, नाना टाकळकर, विठ्ठल रासवे, युसूफद्दीन अन्सारी, विक्रम गायकवाड, अनिल पाटील, सर्जेराव गिराम, एल.आर.कदम, मुक्तार अली, साजिद राज, अफसर अली, मधुकर निरपने, इरफान शेख, गोविंद हरकळ, आप्पा कोल्हेकर, विशूधानंद वैराळे, बंडू पाटील,अमोल भाले पाटील,बाळासाहेब झिंजान, खालेद दादा,मारोती सूर्यवंशी, वैजनाथ कोल्हे, डॉ.महेश कोल्हे, खालेद नाज, दिलीप हिवाळे, शाहू गवारे, अनिल ढवळे,प्रदीप काळे, हसीब खान, सतीश वाकडे, बंडू कांबळे, वाहेद खान,उत्तम झिंजुर्डे,शोएब खान,प्रमोद चाफेकर इत्यादींची उपस्थिती होती.यावेळी माजलगाव येथील धनंजय पापा सोळंके यांनी जय शिवाजी जय भवानी च्या घोषणा देत सेलू कॉर्नर परिसर दनानून सोडला. यावेळी आलेल्या शिवप्रेमी मध्ये उत्साह ओसंडून वाहत होता.



जिल्हा नियोजन समिती अंतर्गत रूढी पाटी देवसंस्थान सभा मंडपासाठी ९० लक्ष रुपयाचा निधी उपलब्ध करून दिला.असे येथील भूमिपूजना वेळी सईद खान यांनी सांगितले.यावेळी संस्थानाचे ह.भ.प १००८ मनीषानंद पुरी महाराज यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक बालाजी कुऱ्हाडे,दिनेश कोकर,किशोर चव्हाण,युनूस भाई,बालाजी गोलाईत, प्रल्हाद नाना चिंचाने, जिल्हाध्यक्ष नाना टाकळकर,तालुकाप्रमुख प्रमोद तारे,सर्जेराव गिराम,गोविंद हरकळ, विजय नखाते,मोईन अन्सारी,नरसोबा अण्णा,थोरे गुरुजी व अनेक पदाधिकारी तसेच शिवसेना नेते कार्यकर्ते उपस्थित होते.

# भारतीय बौद्ध महासभेची जिंतुरात शांतता रॅली

प्रतिनिधी @ जिंतुर

त्रिगुणी पावन वैशाख अर्थात बुद्ध पौर्णिमेनिमित्त भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने तथागत गौतम बुध्द यांच्या जयंतीनिमित्त शांतता रॅली काढण्यात आली. भारतीय बौद्ध सभेचे तालुकाध्यक्ष मोहन घनसावंत व सुनिताताई पाटील याच्या मार्गदर्शनाखाली व उपाध्यक्ष राजाभाऊ काळे याच्या अध्यक्षतेत ही रॅली काढण्यात आली. याप्रसगी पुज्य भन्ते एस संघमित्र यांनी आपल्या प्रमुख धम्मदेसनेत उपस्थिताना मार्गदर्शन केले. माजी तालुकाध्यक्ष बौद्धाचार्य शिवाजी लाटे आणि बौद्धाचार्य आनंदराव वाकळे यानी पाली मराठीमध्ये पचशिल घेतले. यशस्वितेसाठी महेंद्र




बनसोडे आशाताई वाकळे आणि सिमाताई वाकळे आशाताईं खिल्लारे कैलास वाकळे. स्वप्निल रायबोले, नितीन वाकळे धनराज घनसावंत. अनिल वाघमारे यांनी परिश्रम घेतले. सुत्रसचालन बौद्धाचार्य आनंदराव वाकळे यांनी तर आभार कैलास वाकळे यांनी मानले. यावेळी शंकर भारशंकर, अँड कुमार घनसावंत, रामरावजी उबाळे, बंटी भैय्या निकाळजे, अँड चंद्रकांत बहिरट, देवानंद सावंत, प्रकाश नवसागर, रामराजे घनसावंत, ऑड,रमेश भडगळ, अशोक बंड, डॉ विलास वाकळे, पांडुरंग तुपसुंदर, संभाजी खिल्लारे उपस्थित होते. यावेळी धम्म उपासक उपासिका याची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.



# स्त्री रुग्णालयात जागतिक परिचारिका दिन साजरा

प्रतिनिधी @ परभणी

शासकीय स्त्री रुग्णालयात जागतिक परिचारिका दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वैद्यकीय अधीक्षक डॉ.नरेंद्र वर्मा ह तर अधिसेविका चंदाराणी लेमाडे, डॉ.अरुणा राठोड, डॉ.हसीब,डॉ.गिरी, डॉ.आपेट यांची उपस्थिती होती. आधुनिक परिचर्येचा पाया घालणाऱ्या फ्लोरेन्स नाइटिंगेल यांच्या जन्मदिनानिमित्त जागतिक परिचारिका दिन जगभर साजरा केला जातो. कार्यक्रमाच्या सुरुवातीस फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांच्या प्रतिमेचे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. सर्व परिचारिकांनां हातात मेणबत्ती पेटवून परिचर्येची शपथ अधिसेविका चंदाराणी लेमाडे यांनी दिली.

डोळ्यात तेल घालून अहोरात्र रुग्णांची सेवा करणाऱ्या परिचारिकांचा सन्मान करण्याचा हा जागतिक परिचारिका दिन असल्याचे मत डॉक्टर नरेंद्र वर्मा यांनी व्यक्त केले.यशस्वीतेसाठी इन्चार्ज छाया बागुल, मीना पांचाळ, जरीना शेख, रमा हनवते, उज्वला कराळे, शितल शिंदे, शितल सोनकांबळे, लीना मुजमुले, सुरेखा लांडे, शार्लेट दारू, अमृता फुलारी, अर्चना रोकडे, शुभांगी कांबळे, फरीन पठाण,वसीमा चौधरी, दिव्या कानडे, संध्या गवळे, वर्षा निकम, शितल धाबे, शुभांगी कांबळे, आशा अवचार, पूजा शेळके आदींनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले

# भारतीय अर्थव्यवस्थेत बांधकाम कामगारांचे मोठे योगदान - आ.डॉ.गुट्टे

प्रतिनिधी @ गंगाखेड

बांधकामातील गुंतवणूक ही भारताच्या जीडीपीच्या जवळपास ११ टक्के आहे. दिवसेंदिवस भारत बदलत असून आधुनिक होत आहे. त्यामुळे बांधकाम उद्योगाला विशेष चालना मिळत आहे. मात्र, त्या बांधकाम उद्योगामध्ये आपल्या बांधकाम कामगारांचे मोठे कष्ट आहे. त्यांच्या कष्टावर आणि घामावर भारत प्रगती करतो आहे. अशा बांधकाम कामगारांसाठी शासन सातत्याने विविध योजना राबवित आहे, ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. मात्र, भारतीय अर्थव्यवस्थेत बांधकाम कामगारांचे मोठे योगदान आहे, ही बाब कोणालाही नाकारता येणार नाही, असे प्रतिपादन आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांनी केले.

शहरातील स्व.गोपीनाथ मुंडे अन्नछत्र सभागृह येथे शासकीय योजना मदत केंद्राच्या वतीने आयोजित गृहोपयोगी साहित्य संच वाटप कार्यक्रमात ते बोलत होते. पुढे बोलतांना त्यांनी कामगार बांधवांसाठी सुरू असलेल्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. शिवाय, शासकीय योजना मदत



केंद्राने आजपर्यंत केलेल्या कामगिरीची योजनानिहाय आकडेवारी उपस्थित जनतेसमोर ठेवली. कष्टकरी बांधवांना आधार देण्यासाठी या सर्व योजना नवसंजीवनी ठरत आहेत. त्यामुळे गरजू आणि होतकरू बांधवांपर्यंत या योजना तत्परतेने पोहोचवा, असेही आवाहन उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना केले. याप्रसंगी तब्बल ७४६ लाभार्थी बांधवांना या गृहोपयोगी साहित्य संचाचे वाटप केले. या संचामध्ये किचन स्टीलची भांडी, तवा, कढई, चमचे, वाटी, थाळी अशा दैनंदिन वापरातील महत्त्वाच्या वस्तूंचा समावेश आहे.

प्रास्ताविक अभिजीत चक्के तर सूत्रसंचालन पद्माकर देवा जोशी यांनी केले. तसेच सचिन राठोड यांनी आभार मानले. यावेळी विधानसभा अध्यक्ष किशनराव भोसले, रासपा प्रदेश सरचिटणीस नंदकुमार पटेल, मित्र मंडळाचे जिल्हाध्यक्ष संदीप आळनुरे, अल्पसंख्याक अध्यक्ष इक्बाल चाऊस, शहराध्यक्ष सय्यद अकबर, माजी उपनगराध्यक्ष राधाकिशन शिंदे, माजी नगरसेवक राजू खान, ड.कलिम शेख, तुकाराम तांदळे, प्रताप मुंडे, माणिकराव आळसे, उद्धव शिंदे, वैजनाथ टोले, संजय पारवे, खालेद शेख, माजी नगरसेवक नागनाथ कासले, शेख चांदभाई, संदीप केंद्रे, संतोष पेकम, राजेश दामा, महेश शेटे, साबेर शेख, संदीप राठोड, सतीश घोबाळे यांच्यासह राष्ट्रीय समाज पक्ष व मित्र मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, प्रतिष्ठित व्यापारी आणि शहरवासीय मोठ्या उपस्थित होते.

...तर सर्व देश भारतीय सैनिकांच्या सोबत!

देशाच्या सीमेवर सैनिक अहोरात्र सजग असतो. आपण सैनिकांच्या बलिदानाचा सन्मान केला पाहिजे. सैनिकाचे जीवन हे त्याच्या कुटुंबासाठी, समाजासाठी आणि देशासाठी बलिदान असते. एका सैनिकाचे बलिदान हे केवळ त्याचे जीवन देण्यात नाही, तर त्याच्या स्वप्नांचा, इच्छांचा आणि व्यक्तिगत सुखांचा त्याग करण्यातही असते. जेव्हा सैनिक आपल्या सर्व सुखांचा त्याग करून तिथे आपल्यासाठी उभा आहे तेव्हा त्याचे सुरक्षा व मनोबल वाढवण्यासाठी आपण परमपित्याला ईश्वराला प्रार्थना तर नक्कीच करू शकतो. त्यामुळे सीमेवर लढत असलेल्या भारतीय जवानांच्या सुरक्षेसाठी आणि त्यांचे मनोबल वाढवण्यासाठी प्रार्थना करा, अशा शब्दात आमदार डॉ.गुट्टे यांनी सैनिकांप्रति आपल्या संवेदना व्यक्त केल्या.

# तथागत भगवान गौतम बुध्द यांना अभिवादन

प्रतिनिधी @ सेलु

तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या २५८७ व्या जयंतीच्या निमित्ताने गायत्रीनगर येथील पंचशील बुद्ध विहारात अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी जिल्हा कॉंग्रेस सरचिटणीस मिलिंद सावंत,सेलूचे सहा पोलिस निरीक्षक प्रभाकर कवाळे, ड हर्षवर्धन सोनकांबळे, ड सुनील डबाळे, ड अक्षय प्रधान, साळवे गुरुजी, गंगाधर खेबाळे गुरुजी, गायकवाड, तात्या साळवे आदी उपस्थित होतो.यशस्वीतेसाठी सिद्धार्थ शिरसाट, विजय खेबाले, आनंद साळवे, अक्षय




साळवे, लताताई नाटभजे यांनी परिश्रम घेतले.यावेळी सिद्धार्थ नवयुवक मंडळाच्या वतीने खिरदान करण्यात आले.

# शिवलिंग बोधने यांचा राज्यस्तरीय शहीद भगतसिंग बेस्ट आंदोलक पुरस्कार

प्रतिनिधी @ परभणी

प्रहार जनशक्ती पक्षाच्या विभागीय मेळाव्यामध्ये प्रहार जनशक्ती पक्षाचे परभणी जिल्हा प्रमुख शिवलिंग बोधने यांना राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाचा शहीद भगतसिंग बेस्ट आंदोलक पुरस्कार संस्थापक अध्यक्ष तथा माजी राज्यमंत्री बच्चुभाऊ कडू यांच्या हस्ते देण्यात आले.

शिवलिंग बोधने हे मागील तीस वर्षापासून राजकीय क्षेत्रामध्ये काम करत असून प्रहार जनशक्ती पक्षाच्या माध्यमातून मागील दहा वर्षापासून जनतेच्या प्रश्नावर विविध आक्रमक व अनोखे आंदोलन करून संबंधित आंदोलन यशस्वी करून जनतेच्या प्रश्नावर न्याय मिळवून देण्याचे काम नेहमीच त्यांच्या मार्फत केली जाते. त्यांनी आजपर्यंत अनेक अनोखे लक्षवेधी व आक्रमक आंदोलने करून प्रशासनाचे जनतेच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले आहे. तसेच त्यांनी आजपर्यंत १०८ वेळा स्वच्छा रक्तदानही केलेले आहे. त्यांच्या याच अनोख्या आक्रमक व लक्षवेधी आंदोलनाची दखल प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने घेण्यात आली आणि त्यांना राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाचे शहीद भगतसिंग बेस्ट आंदोलक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी त्यांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला.



यावेळी प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष माजी राज्यमंत्री बच्चुभाऊ कडू, संताजी धनाजी सन्मान सोहळा अभियान प्रमुख महेशजी बडे, पक्ष निरीक्षक अमितजी ठाकूर, प्रहार जनशक्ती पक्षाचे नांदेड शहर जिल्हा प्रमुख प्रीतपाल सिंग साहू, जिल्हा प्रमुख विठ्ठल देशमुख, परभणी तालुका प्रमुख उद्धव गरुड, मानवत तालुकाप्रमुख माणिक राठोड, पाथरी तालुका प्रमुख दीपक खुडे, पालम तालुकाप्रमुख बळीराम इंगळे, वैभव संघई, पूर्णा तालुका प्रमुख शिवर सोनटक्के, शहर प्रमुख अंकुश गिरी, पूर्णा शहर प्रमुख संजय वाघमारे तसेच परभणी नांदेड व हिंगोली येथील प्रहार जनशक्ती पक्षाचे तथा प्रहार दिव्यांग क्रांती आंदोलनाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते




प्रतिनिधी @ परभणी

जयहिंद सेवाभावी शिक्षण संस्थेच्या वतीने दिल्या जाणार्या महाराष्ट्र गौरव पुरस्काराने विविध मान्यवरांना सन्मानीत करण्यात आले. येथील वकील कॉलनी येथील औषधी भवनात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खा. संजय जाधव हे तर इंजि. आर. डि. मगर, माजी उपमहापौर भगवान वाघमारे, चित्रपट निर्माता दिग्दर्शक गफार मास्टर, खदिर लाला हाश्मी, हाजी शफीक शेख, अजमत खान, शेख सरफराज व आयोजक सत्तार इनामदार आदींची उपस्थिती होती. यावेळी शिक्षण क्षेत्र, पत्रकारिता, सामाजिक कार्य, व्यवसाय क्षेत्र, कला क्षेत्र, आदर्श शिक्षक, प्रशासकीय, विधिद्य, कृषी विभाग अश्या विविध क्षेत्रातील मान्यवरांचा महाराष्ट्र गौरव पुरस्कार देवून सन्मान करण्यात आले. मागील २८ वर्षापासुन हा महाराष्ट्र गौरव सोहळा जयहिंद सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सत्तार इनामदार हे आयोजित करत आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुकुंद नंद यांनी केले.

# तैलिक महासभेच्या जिल्हाध्यक्षपदी सतिश नगरसाळे

प्रतिनिधी @ परभणी

येथील महाराष्ट्र प्रांतिक तैलीक महासभेच्या जिल्हा अध्यक्ष पदी सतिष बापुअप्पा नगरसाळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. शहरातील स्टेशन रोड येथील सभागृहात महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा नांदेड विभागाच्या वतिने नुतन पदाधिकारी निवडीचा कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी राज्य उपाध्यक्ष डॉ.रावसाहेब राऊत, विभागिय अध्यक्ष मधुकरराव राऊत, कार्याध्यक्ष प्रा.काशिनाथ सालमोटे, मा.अध्यक्ष भास्करराव देवडे, सचिव पांडुरंग शिंदे , सहसचिव रमेश चांदीवाले, गजानन तायडे, आंबादसराव क्षीरसागर, रामअप्पा दावलबाजे, रत्नाकर सुर्यवंशी, प्रल्हाद भिसे, अँड सुभाष भरदम,



रामदास पाटील, सखाराम लासे, पांडुरंग माने, दशरथअप्पा शिंदे, डॉ.प्रल्हाद भिसे, निळकंठ राऊत, दिनु माने, प्रा.संतोष साखरे, प्रल्हाद देवडे, संजय गौरकर, शिवशंकर सोनुने, संतोष माने, निलेश खंदारे, रमेश राऊत, मनमथ देशमाने, पवन राऊत तसेच परभणी शहर व जिल्हा भरातून आलेले तेली समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.शांतीलींगआप्पा काळे यांनी केले.

# मोदी ज्वेलर्स आयोजित उखाणा स्पर्धेत सौ. पल्लवी बोडखे ठरल्या प्रथम विजयाच्या मानकरी

प्रतिनिधी @ अंबाजोगाई

पारंपरिक ठसकेबाज शैलीतले पल्लेदार उखाणे , काही मिश्किल , चिमटे काढणारे उखाणे, काही चमकदार नवीन कल्पनांचा आविष्कार तर कधी हास्याचे फवारे आणि उत्स्फूर्त टाळ्यांचा गजर अशा अपूर्व उत्साहात मोदी ज्वेलर्सची उखाणा रंगतदार स्पर्धा नुकतीच संपन्न झाली. नथ महोत्सवाच्या निमित्ताने मोदी ज्वेलर्सच्या वतीने उखाणा स्पर्धेचे आयोजन केले होते.या आगळ्यावेगळ्या व अनोख्या स्पर्धेला अंबाजोगाई शहर तथा पंचक्रोशीतील महिलांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला. ही स्पर्धा सुरू असताना अचानकपणे आलेला पाऊस व त्यामुळे सुरू झालेला विजेच्या लपंडाव याचा महिलांच्या उत्साहावर कोणताही परिणाम झाला नाही. आपल्या कुटूंबावर असलेले निरातिशय प्रेम व्यक्त करणाऱ्या उखाण्यांबरोबरच पर्यावरण, आरोग्य, सामाजिक व इतर विषयांवरचे स्वरचित उखाणे हे स्पर्धेचे वैशिष्ट्य ठरले. यातच ऑपरेशन सिंदूर विषयी एका सोज्वळ तथा चाणाक्ष गृहिणीच्या आपल्या उखाण्याद्वारे तितक्याच कणखर भावना अत्यंत समर्पक शब्दांत सादर केलेल्या पल्लवी राहुल बोडखे यांनी निर्विवाद प्रथम क्रमांक (रु.५०००/-रोख ,प्रशस्तीपत्र) पटकावला. इतर विजेत्या स्पर्धकांमध्ये अस्मिता थोरात द्वितीय क्रमांक(रु.३,०००/-रोख व प्रशस्तीपत्र), शीतल चाटे ,अयोध्या घोडके (तृतीय क्रमांक विभागून प्रत्येकी (रु.१,०००/- रोख व प्रशस्तीपत्र) यांच्यासह विविध उत्तेजनार्थ स्पर्धकांच्या बक्षिसात (प्रत्येकी रु.५०० /- रोख व प्रशस्तीपत्र ) ज्यामध्ये कांता सोमाणी , सुमेधा चाटे, अर्चना स्वामी ,



वैशाली केंद्रे,अंजली यादव , जयनंदा इंगळे,उज्वला होट्टे , लक्ष्मी नागरगोजे, उर्मिला सोनवणे , कीर्ती बोकण आणि राजकुमारी किर्दंत(विभागून) यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले.

या उखाणा स्पर्धा व बक्षीस वितरण प्रसंगी सुनीता राजकिशोर मोदी, सरोज भूषण मोदी, प्राजक्ता प्रमोद गावरस्कर , रचना मोदी ,डिंपल संकेत मोदी , श्रीमती बिराजदार यांच्या उपस्थिती मध्ये सर्व सहभागी स्पर्धकांना भेटवस्तू देण्यात आल्या.याप्रसंगी मोदी ज्वेलर्सचे संचालक भूषण मोदी , प्रमोद गावरस्कर , विनायक मुंजे यांच्यासह अनेक पुरुष व महिला ग्राहक मोठ्या उपस्थित होते. या अनोख्या स्पर्धेचे परीक्षक म्हणूनयोग प्रशिक्षक मंदाकिनी गित्ते आणि आनंद क्षेमकल्याणी यांनी काम पाहिले तर मनीषा क्षेमकल्याणी यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मोदी ज्वेलर्सच्या सर्व कर्मचारी वर्गाने परिश्रम घेतले.

# तुपकर यांचे वाढदिवशी घराच्या अंगणातच करणार परिवारासहित उपोषण

प्रतिनिधी @ केज



दि.१३ मे हा रविकांत तुपकरांचा जन्मदिवस असला तरी,तो साजरा करणे ही गोष्ट त्यांच्या स्वभावात कधीच नव्हती.आजपर्यंत रविकांत तुपकरांनी कधीच वाढदिवसाचा इव्हेंट केला नाही.बॅनर, पोस्टर,फलक लावून जाहिरातबाजी करणे, जल्लोष करण्याऐवजी ते नेहमीच हा दिवस सामान्य दिवसासारखा कार्यासाठी समर्पित करतात.कार्यकर्त्यांनी बॅनर पोस्टर लावू नये अशा त्यांच्या सूचना असतात.यावर्षी तर देशावर झालेल्या हल्ल्याच्या दुःखद प्रसंगामुळे हा दिवस पुष्पगुच्छ घेऊन साजरा करणं त्यांच्या दृष्टीने अधिकच अशोभनीय आहे.पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ निरपराध नागरिकांचा बळी गेला आहे.त्यातच दिवसाला १० शेतकरी आत्महत्या करत आहेत,शेतमाला ला भाव नाही,बँकानी लावलेले होल्ड,बँका कडून बळजबरीने होणारी वसूली,अनेक शेतकरी पीकविम्या पासून वंचित,शेतकरी प्रचंड अडचणीतून जातोय,तरुण अस्वस्थ आहे,देशातील वातावरण अस्थिर आहे अशा पार्श्वभूमीवर वाढदिवस साजरा करण्याचा विचारही त्यांच्या व सहकाऱ्यां च्या मनाला अजिबात पटत नाही.या पार्श्वभूमी वर रविकांत तुपकरांनी सर्व हितचिंतकांना विनंती केली आहे की, त्यांनी कुठलाही वाढदिवसाचा कार्यक्रम, सोहळा किंवा पोस्टर बाजी करू नये.

शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती,हक्काचा पिकविमा,शेतकरी आत्महत्या,पहेलगाम हल्ला या पार्श्वभूमीवर दि.१३ मे च्या दिवशी रविकांतभाऊ तुपकर सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत घराच्या अंगणात त्यांच्या परिवारासहित एक दिवसीय उपोषण करून सरकारचे लक्ष वेधणार आहे व शेतकऱ्यांप्रति कृतज्ञता व्यक्त करणार आहेत.जन्मदिवसानिमित्त कोणतीही भेटवस्तू, पुष्पगुच्छ आणू नयेत. हितचिंतकांचा या उपोषणात मिळणारा सहभाग,पाठिंबा आणि साथ हीच माझ्यासाठी सर्वात मोठी भेट असणार आहे,असे भावनिक आवाहनही रविकांत तुपकर यांनी केले आहे.

# पाटोद्यात बुद्ध जयंती निमित्त शांतता,समता आणि करुणेचा जागर

## भीमनगर बुद्ध विहारात पंचशील ध्वजारोहण, शांततेत मिरवणूक व सामूहिक पूजापाठाचे आयोजन

प्रतिनिधी @ पाटोदा

जगाला जर शांतता हवी असेल तर बुद्धाचे तत्व स्वीकारावे लागतील... युद्धाने कटूता वाढते तर बुद्धाने प्रेम वाढते, या विचारांचा जागर करत भगवान गौतम बुद्ध यांची जयंती पाटोदा शहरात अत्यंत शांततेत,भक्तिभावाने आणि सामाजिक सलोख्याने साजरी करण्यात आली.या निमित्ताने भीमनगर येथील बुद्ध विहारात सकाळी पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. पंचशील ध्वज हा समतेचा, शांततेचा आणि करुणेचा प्रतीक असून, याच्या माध्यमातून तथागतांच्या शिकवणीचा प्रसार करण्यात आला. ध्वजारोहणानंतर विहारात भगवान बुद्धांच्या प्रतिमेची विधीवत पूजा पार पडली.यानंतर बुद्ध मूर्तीची भव्य शांततेत मिरवणूक पाटोदा शहरातून काढण्यात आली. मिरवणुकीत विविध वयोगटातील बौद्ध अनुयायी, महिला, तरुण, बालगोपाळ यांनी सहभाग घेतला. डोक्यावर पंचशील ध्वज, हातात घोषवाक्यांचे फलक आणि डॉल-ताशांच्या गजरात मिरवणूक शहरातून मार्गस्थ झाली. जय भीम च्या घोषणांनी शहराचे वातावरण भारावून गेले होते.



शहरातील नागरिकांनी मिरवणुकीचे विविध ठिकाणी उत्स्फूर्त स्वागत केले. या शिस्तबद्ध व शांततेत पार पडलेल्या मिरवणुकीमुळे बौद्ध अनुयायांचे संघटन, संस्कृतीप्रेम आणि सामाजिक बांधिलकी अधोरेखित झाली.मिरवणुकीनंतर बुद्ध विहारात सामूहिक पूजापाठ पार पडला. विशेष पूजेनंतर सर्व उपस्थित भाविकांसाठी भोजनदानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी स्थानिक कार्यकर्त्यांनी संयोजन केले.बुद्ध पौर्णिमा हा केवळ धार्मिक उत्सव नसून, तो समतेचा, करुणेचा आणि शांततेचा जागर करणारा दिवस आहे. या निमित्ताने पाटोदा शहराने तथागतांच्या विचारांचा प्रसार

# तीन जिवलग मित्रांना एकाच वेळी लागली नोकरी

## चिंचवन येथील ओमकार मात्रे, आदिनाथ मात्रे, पवन कोठुळे यांची महापारेषणमध्ये भरती

प्रतिनिधी @ वडवणी

ते तिघे एकाच गावचे असल्यामुळे बालपणापासून सोबत खेळले, बागडले. घरची परिस्थिती हालाखीची असल्यामुळे लहानपणी स्वप्न रंगू लागले. गावातील वीज मंडळाचे कार्यालय पाहिलं की आपणही एक दिवस या साहेबांसारखं नोकरी करावी अशा भावना ते व्यक्त करत. आणि मोठ्याने हसत आणि तो दिवस आला ज्या दिवशी हे तिघेही बालमित्र महापारेषण मध्ये नोकरीला लागले. चिंचवन येथील या मित्रांची कथा ऐकली, पाहिल्यानंतर गावकऱ्यांचे उर देखील भरून आलं. आणि चिंचवन गावकऱ्यांनी मुधुमधडाक्यात या आपल्या गावच्या सुपुत्रांचा भव्य दिव्य सत्कार गावात केला. या कार्यक्रमाचे आयोजक युवा नेते ईश्वर तांबडे डॉ.अंगद तांबडे पत्रकार हनुमंत मात्रे यांनी केले.

चौकट सेवानिवृत्त शिक्षक शेख महबूब शेख अब्बास यांचे देखील गावकऱ्यांच्या मार्फत भव्य सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या त्यांनी देखील गावकऱ्यांना त्याप्रसंगी मार्गदर्शन केलं.



तालुक्यातील चिंचवन येथील रहिवासी असलेले चिरंजीव ओमकार मात्रे, आदिनाथ मात्रे व पवन कोठुळे हनुमंत आंधळे या चार जणांचा गावकऱ्यांच्या मार्फत भव्य सत्कार करण्यात आला. हे तिन्ही बालमित्र यांच्या घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. पवनचे आई वडील दरवर्षी परभागामध्ये ऊस तोडणीचे काम करतात त्यामुळे त्याचं शिक्षण अत्यंत हलाखीच्या परिस्थितीमध्ये झालं. ओमकार यांचे आई वडील हे देखील ऊसतोड कामगार आहेत.

त्याच्याही वडिलांना केवळ दोन एकर जमीन आहे. त्यामुळे त्याच्या घरची परिस्थिती बेताचीच आहे. तर आदिनाथ याच्या घरची परिस्थिती देखील सर्वसामान्यच आहे. त्यांचेआई वडील देखील शेतामध्ये काम करूनच उदरनिर्वाह करतात या तिन्ही मुलांनी बालपणीपासून सोबतच गावातील मंकावती शाळेमध्ये घेतलं शिकत असताना गावातील वीज मंडळाचे कार्यालय त्यांना नेहमी दिसत असे. या कार्यालयामध्ये येणारे जाणारे कर्मचारी पाहून त्यांना असं वाटायचं की आपणही एक दिवस या साहेबांसारखे नोकरीला लागू. हे स्वप्न रंगवत त्यांनी शिक्षण पूर्ण केलं. शिक्षण घेऊन त्यांनी महापारेषण परीक्षा दिली. एकाच वेळी परीक्षेमध्ये पास झाले. या तिघांनाही एकाच दिवशी नियुक्ती मिळाली त्यामुळे या तिन्ही मित्रांचे स्वप्न साकार झालं. गावामध्ये त्यांच्या निवडीची माहिती मिळताच गावकऱ्यांनी फटाक्याच्या अतिश बाजी करून या तिन्ही तरुणांचं स्वागत केलं. गावातील सर्व नागरिकांनी एकत्र येत हनुमान मंदिराच्या भव्यदिव्य प्रांगणात या तिघांचाही नागरी सत्कार केला. गावातील सर्व नागरिक यावेळी उपस्थित होते. प्राचार्य सोमनाथराव बडे, युवा नेते ईश्वर तांबडे, डॉ. अंगद तांबडे, शेख मेहबूब सर, हनुमंत मात्रे, प्रताप मात्रे, अंगद मात्रे, अरुण कोठुळे, विष्णू कोठुळे, नवनाथ तांबडे, शिवाजी मुंडे, डॉक्टर दुटळ साहेब, बालासाहेब बडे, सुरेश दोडताले, शिवाजी दोडताले ,बालू तुरे लक्ष्मण मात्रे ,गोवर्धन कुटुळे, शहादेव मात्रे ,अंगद बडे, अशोक मात्रे, वाघा मात्रे, कृष्णा नखाते ,सुखदेव कुटुळे, विष्णू कुटुळे ,पांडुरंग मात्रे ,विक्रम कुटुळे, शिवाजी कोठुळे, शेख साहिल, अरुण कुटुळे ,लिंबा मात्रे, देवानंद तांबडे ,अखिल कोठुळे, संदीप नानवर, पुरुषोत्तम आबा तांबडे, अमोल पोळ , इंदू बडे ,नाजम शेख ,तात्या कुटुळे, सुग्रीव मात्रे, बाबुराव तावरे ,सखाराम बडे असे अनेक मान्यवर स्वागत कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

# मराठी पत्रकार परिषद प्रिंट व डिजीटल मिडीयाच्या सदस्यांनी एकत्र येवून कार्य करावे- जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके

प्रतिनिधी @ अंबाजोगाई

पुढील काळ सर्व पत्रकारांसाठी आव्हानात्मक असून अंबाजोगाई मराठी पत्रकार परिषद प्रिंट व डिजीटल मिडीयाच्या सर्व सदस्यांनी एकत्र येवून कार्य करावे,असे मत मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके यांनी व्यक्त केले. आज दुपारी अंबाजोगाई शहरातील बाळशास्त्री जांभेकर पत्रकार कक्षात मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या आदेशावरून मराठी पत्रकार परिषद प्रिंट व डिजीटल मिडीयाची बैठक संपन्न झाली.या बैठकीच्या अध्यक्षस्थानी बीड जिल्हाकार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून मराठी पत्रकार परिषदेचे विभागीय सचिव रवि उबाळे हे उपस्थित होते.तर व्यासपीठावर जिल्हा समन्वयक दत्तात्रय अंबेकर व अंबाजोगाई पत्रकार वैद्यकीय कक्ष प्रमुख डॉ.राजेश इंगोले यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष विशाल सांळुके म्हणाले की,बीड जिल्हयात अंबाजोगाई शहराचे नाव लौकिक आहे.मराठी पत्रकार परिषदेचे सर्वात जास्त कार्यक्रम हे अंबाजोगाईत होतात.मराठी पत्रकार परिषदेच्या सदस्यामुळेच संघटनेची ओळख असते.अंबाजोगाई मराठी पत्रकार परिषद प्रिंट व डिजीटल मिडीया हे एकाच छताखाली कार्य करतात.विश्वस्त एस.एम.देशमुख यांचे कार्य महाराष्ट्रात सर्वदूर आहे. मराठी पत्रकार परिषदेच्या सदस्याच्या सुखदुःखात सदैव साथ देणारी ही पत्रकार संघटना आहे. या बैठकीत शेगाव येथे होणाऱ्या आगामी अधिवेशना बाबतही चर्चा करण्यात आली

तसेच मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात अंबाजोगाई येथे डीजीटल कार्यशाळेचे आयोजन करण्यात येईल.आधुनिक तंत्रज्ञान आणि डीजीटल बातम्यातील बारकावे आदीची माहिती डीजीटल मिडीयाच्या पत्रकारांना ज्ञात व्हावे या करिता लवकरच कार्यशाळेचे आयोजन करण्यात येईल अशी माहितीही सांळुके यांनी दिली. तर विभागीय सचिव रवि उबाळे यांनी ही आपले मनोगत व्यक्त करताना म्हटले की, बीड जिल्ह्यातील मराठी पत्रकार परिषद प्रिंट व डिजीटल मिडीयाच्या सर्व सदस्य हे संघाचे अंगभूत नेतृत्व करणारे सदस्य आहेत.विशेष करून अंबाजोगाई मराठी पत्रकार परिषदेचे सर्व सदस्यांचे कार्य उल्लेखनीय असून विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या सूचनेवरून लवकरच अंबाजोगाई शहरात डीजीटल कार्यशाळेचे आयोजन कसे होईल याचा विचार केला जाईल असे ही शेवटी बोलताना म्हणाले.

तर अंबाजोगाई मराठी पत्रकार परिषदेचे वैद्यकीय कक्ष प्रमुख डॉ.राजेश इंगोले यांनी



पत्रकार आणि डॉक्टर यांचे कार्य एकच आहे.डॉक्टर जीव वाचवतात तर पत्रकार अन्यायाला वाचा फोडतात.तेव्हा विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रात ठिकठिकाणी वैद्यकीय कक्ष प्रमुख म्हणून डॉक्टरांची नेमणूक करणार असून पत्रकारांनी कुठलेही मतभेद न ठेवता कार्य करावे,असे मत व्यक्त केले.या बैठकीचे सुत्रसंचलन पुनमचंद परदेशी,प्रास्ताविक सतिश मोरे तर आभार प्रदर्शन ज्ञानेश मातेकर यांनी केले.

या बैठकीत अनेक विषयांवर चर्चा करण्यात आली.यावेळी,मराठी पत्रकार परिषदेचे उपाध्यक्ष मारोती जोगदंड, डिजीटल मिडीयाचे तालुकाध्यक्ष अभिजीत लोमटे, उपाध्यक्ष संजय जोगदंड,विरेंद्र गुप्ता,एम.एम.कुलकर्णी,सलीम गवळी,वासुदेव शिंदे,बालाजी खैरमोडे, व्यंकटेश जोशी,सालेम पठाण, अशोक कोळी,अनिरुद्ध पांचाळ, अमोल माने,सचिन मोरे,संजय रानभरे,अरेफ भाई,योगेश डाके,सुर्यकांत उदारे सह मराठी पत्रकार परिषद प्रिंट व डिजीटल मिडीयाचे सदस्य उपस्थित होते.

पत्रकार कन्या अक्षता सुर्यवंशी हिचा सत्कार करण्यात आला.

आज झालेल्या बैठकीत बर्दापूर येथील पत्रकार गोविंद सुर्यवंशी यांची कन्या कु.अक्षता सुर्यवंशी यांची महापारेषण विभागात विद्युत सहय्यक पदी निवड झाल्याबद्दल उपस्थित मान्यवर पत्रकार विशाल साळुंके,रवि उबाळे यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला.

# संतांच्या संगतीत अर्ध्या क्षणात मानवी जीवनाचे कल्याण होते ह.भ.प. समाधान महाराज शर्मा

प्रतिनिधी @ केज

संतांच्या संगतीत अर्ध्या क्षणात मानवी जीवनाचे कल्याण होते असे प्रतिपादन भावरत्न गुरुदास सुप्रसिद्ध विविध कथाकार व महाराष्ट्रातील नामवंत किर्तनकार ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांनी केले.ते स्वामी समर्थ मठामध्ये सार्ध शतकपुर्ती सोहळ्यात किर्तन सेवा प्रसंगी बोलत होते.केज येथील स्वामी समर्थ मठाची स्थापना प.पु.श्रीमंत नानासाहेब महाराज उर्फ महारुद्र देशपांडे यांनी दिडशे वर्षांपूर्वी केली आहे.अक्कलकोट निवासी स्वामी समर्थ महाराज यांनी स्वहस्ते प्रासादिक पादुका तसेच स्वामी समर्थ यांची बाल स्वरुपातील पंचधातूची मुर्ती, स्वामी समर्थ यांच्या हातातील काठी व भिरकावून मारलेला गोटा प.पु.नानासाहेब महाराज देशपांडे केजकर यांना प्रदान करून केज येथे मठ स्थापन करण्याची आज्ञा केली होती.या प्रासादिक मठाला सार्ध शतक म्हणजे दिडशे वर्ष पूर्ण होत आहेत. त्या निमित्त शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी सोहळा साजरा केला जात आहे.या निमीत्त दि.११ मे २०२५ रोजी रविवारी भावरत्न गुरुदास विविध कथाकार ह.भ.प. समाधान महाराज शर्मा हे बोलत होते.त्यांनी किर्तन सेवेसाठी अर्ध क्षण घडता संतांची संगती । तेणें होय शांती महत्पापा ।।१।। संतसंग देई संतसंग देई।आणिक प्रवाही घालुं नको ।।२।। संसार मज न करणें सर्वथा । परमार्थ पुरता हाती देई ।।३।। जनार्दनाचा एका करुणावचनीं । करी विनवणी पायांपाशीं ।।४।। हा संत एकनाथ महाराज यांचा अभंग किर्तन सेवेसाठी घेतला होता.यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की,



संतांच्या संगतीत अर्ध्या क्षणात मानवी जीवनाचे कल्याण होते.संताचे हृदय नवनीत म्हणजे लोण्यासारखे असते. संत चोखामेळा यांच्या दर्शनाने कान्होपात्रा अर्ध्या क्षणात पावन झाली.कृत युगात ध्यान, त्रेता युगात यज्ञ याग तर द्वापार युगात नाम जप व कलीयुगात कथा कीर्तन सांगितले आहे. या चार ही युगातील साधना स्वामी समर्थ मठामध्ये घडत आहेत. स्वामी समर्थ दत्त अवतार असल्याचे सांगत त्यांनी अगर स्वामी नहीं है तो जिक्र क्यों अगर स्वामी है तो फिक्र क्यों असे सांगितले.नानासाहेब महाराज देशपांडे यांच्या मुळे केजकर देशपांडे परिवार व आपण भाग्यवान आहोत स्वामी समर्थ महाराज हयात असताना त्यांनी दिलेल्या प्रासादिक वस्तू आपल्याकडे आहेत त्यामुळे स्वामी समर्थ महाराज कायम आपल्या सोबत आहेत असे त्यांनी सांगितले.या वेळी केज शहरातील तसेच महाराष्ट्र राज्या तील स्वामी भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# गटशिक्षणाधिकारी पदाचा श्रीम.सिमा काळे यांनी स्विकारला पदभार

# सर्वांशी कौटुंबिक नात्याप्रमाणे स्नेह ठेवणार - श्रीम.सिमा काळे

प्रतिनिधी @ आष्टी

आष्टी पंचायत समितीचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव हे नुकतेच ३० एप्रिल २०२५ रोजी सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्या जागी आष्टी पंचायत समितीला पदाचे गटशिक्षणाधिकारी मिळतील अशी अपेक्षा होती. परंतु पुन्हा एकदा सेवा जेष्ठतेनुसार गटशिक्षणाधिकारी हे पद श्रीम. सिमा काळे (टकले) यांच्याकडे आले असून नुकताच त्यांनी आपल्या पदाचा पदभार स्विकारला आहे. त्यांच्या निवडीबद्दल त्यांना शैक्षणिक क्षेत्रातील शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक व विविध शिक्षक संघटनेच्या पदाधिकार्यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिलेल्या आहेत.

गेल्या सात वर्षापासून आष्टीच्या नशिबी प्रभारी गटशिक्षणाधिकारी हे पद असून प्रभारी गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव हे दिनांक ३० एप्रिल २०२५ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या रिक्त जागी गटशिक्षणाधिकारी हे मुळ पदाचे येतील अशी अपेक्षा होती, परंतु पुन्हा एकदा आष्टीचे गटशिक्षणाधिकारी हे पद प्रभारी राहिले आहे. शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती सिमा काळे यांना सेवा जेष्ठतेनुसार प्रभारी गटशिक्षणाधिकारी म्हणून नियुक्ती मिळाली आहे. त्यांनी नुकताच आपल्या पदाचा पदभार स्विकारला असून त्यांचे स्वागत करुन अनेकांनी शुभेच्छा दिल्या आहेत.



यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी श्रीम. सुनिता उगले, केंद्रप्रमुख त्रिंबक दिंडे, श्रीम. आम्रपाली सावंत, बाबासाहेब लोंढे, राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक राजेंद्र लाड, मुख्याध्यापक अर्जुन पाचारणे, अर्जून खंडागळे, शेषराव तोतरे, आस्थापना विभागातील सतीश मासाळकर, राजाराम चव्हाण, विलास सोनवणे, विषयतज्ञ राजाभाऊ भडके, शेख जुनेद, महेश तावरे, बंडू निंबाळकर, बापू शिंदे, फिरोज बागवान, देविदास शिरसाठ, निलेश वलवळे, मनोज यादव, बाळासाहेब काळे, शांतीलाल पानसरे, श्रीम. सविता उगले आदी शैक्षणिक क्षेत्रातील केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व मान्यवर उपस्थित होते.

यावेळी सत्काराला उत्तर देतांना श्रीमा. सिमा काळे यांनी म्हटले की, मी गटशिक्षणाधिकारी कार्यालयाअंतर्गत येणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांशी कौटुंबिक नात्याप्रमाणे स्नेह ठेवून कामकाज करणार आहे. सर्वांनी मला शैक्षणिक कामकाजाबद्दल सहकार्य करावे अशी शेवटी अपेक्षा व्यक्त